
# कलावैभव

## दिवाळी अंक

अंक ३ रा वर्ष २०१३



# कलावैभव

## दिवाळी अंक २०१३

## वर्ष तिसरे ,अंक तिसरा

## माझ्यामना ई प्रकाशन



प्रकाशक

माझ्यामना ई प्रकाशन

संपर्क

mazyamana.ah@gmail.com

ब्लॉग

http://mazyamanaah.blogspot.com/

फेसबुक

https://www.facebook.com/groups/mazyamana/

संपादक

अनघा हिरे

उपसंपादक

शीतल पोटे

मोहना कारखानीस

कार्यकारी संपादक

तारा ठाकरे

कैलास मांडगे

अजय आहुजा

मंदाकिनी रासकर

तांत्रिक सल्लागार

ज्योती कपिले

मुखपृष्ठ व आतील चित्रे

राज कांदळगावकर

अंक सजावट

अनघा हिरे

आतील चित्रे

गुगलच्या सौजन्याने

साहित्यसहभाग

लेख

अहिंसात्मक पद्धतीने तरुणांनी नोंदविला सामाजिक विचार हत्यांचा निषेध

मनो-गती.... अक्षय वाटवे

खरी दिवाळी गावाकडचीच!......अॅड. प्रभाकर येरोळकर

प्रश्न आणि प्रश्न .....प्रदीप ओक

लोकाकडे पाठ फिरवून उभे प्रशासन!......अॅड. प्रभाकर

कुटुंबपद्धतीची आवश्यकता . – सुधाकर देवकुळे .

साउथ आफ्रिका संस्कृती(!!).....अनिल गोविलकर

प्रवास सुखाचा...... श्रीराम वाघमारे,

महा देवींची पूजा-एक नवीन विचार .... मोहना कारखानीस

राजस्थानी चित्रकलेचा खजिना ... माधव विद्वांस

**अष्टाक्षरी / गज़ल...!**

बदीऊज्जमा बिराजदार

ज़हीर कलाम

प्रा.सतीश देवपूरकर

कविकुमार

कविता विभाग

विनय गदो

माधुरी काजवे .

संजय कुलकर्णी.

प्रिन. राम म्हात्रे

संतोष वाटपाडे

तारा ठाकरे

मयुरी कदम

देव पेडणेकर

प्रशांत पनवेलकर

संजय एम निकुंभ

[illegible]

संजय सिंगलवार

घनश्याम

संजय रोंघे

संजय हेडाऊ

रामचंद्र ईकारे

### जरा हटके (विडंबन )

मिलिंद जोशी,

मुरारीभाऊ देशपांडे

गजानन लोखंडे

### चारोळी

कैलास मांडगे

सुहासमोरे

संजय निकुंभ

### ग्राफिटी

सुहास मोरे

सुहास नाडगौडा

### कथा विभाग

स्वर्गाची सहल ...वृषाली गोटखिंडीकर

अंदाज......... अरुण वि देशपांडे

गजाची आई .. संतोष दत्तु पाटील

'बाहेरख्याली'...... अनघा हिरे

### मानिनी (स्त्रियांचे विश्व )

स्त्री.... मंदाकिनी रासकर

मी तीच स्त्री आहे...

खरंच नवरा असा असतो का ?---- स्नेहल जाधव

ती.. नेहा आठवले

### आरोग्य

डोळ्यांची काळजी

दुर्गंधीयुक्त घामापासून सुटका होण्यासाठी..

### भक्ती गीत

मंगेश मेढी

© सर्व हक्क कवीच्या/
लेखकाच्या स्वाधीन



# संपादकीय

नमस्कार,

माझ्यामना ई प्रकाशनाच्या सर्व वाचकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दर वर्षीप्रमाणे यंदाही आम्ही तुमच्यासाठी दिवाळी अंकाची हि मेजवानी आणली आहे .

गेल्या वर्षभरात बर्याच चांगल्या वाईट गोष्टी घडल्या काही गोष्टींनी तर माणुसकीच्या तोंडाला काळिमा फसलाय . विश्वास ह्या शब्दावर सुद्धा विश्वास ठेवणे आता मुश्किल झालेय. पण आपल्याला काय करायचे ...आलेला आपला आनंदाचा क्षण आपण आनंदाने जगावा असच असत ना जीवन?

जीवन गाणे गातच रहावे

झाले गेले विसरून जावे

पुढे पुढे चालावे ...

हो अगदी असेच करायचे आहे ना आपल्याला? पण आपणही समाजाचे देणे लागतो याची आठवण ठेवून आपण परतफेड कशी करणार आहोत?

उत्तर एकच :- एक आदर्श नागरिक बनून आपल्या मुलांनाही आदर्शाचे धडे शिकवून आणि तोच एकमेव चांगला मार्ग आपल्या पुढे आहे. समाजाचे झालेले हे अध:पतन ह्या सर्व गोष्टींचा निषेध करूनच आपण आपल्या आनंदाला सुरवात करावी आणि आपल्या बरोबर इतरांनाही आनंदी करावं . आता दिवाळी अंकाच्या ह्या गडबडीत मी तुम्हाला हे काय सांगते असच वाटतंय ना तुम्हाला? पण तुम्ही सगळे आपलीच आहात ( आपली माणस म्हणतात ना ते तसच ) दिवाळी अंकाच विशेष काय ? हे अस किती तरी लिखाण आम्ही फेसबुक वर सहज आणि सतत वाचत असतो . फेसबुक वर नेहमीच दरवळत राहणारे साहित्य आणि त्या साहित्याचे मालक , पालक, चालक हे पण आपल्याला काही नवीन नाही. चार ओळींच्याही साहित्याची जिथे वारंवार चोरी होते त्याच क्षेत्रात भल्यामोठ्या साहित्याचे काय पण घाबरू नका इथे असलेले सर्व साहित्य प्रामाणिकपणे तुमच्यापुढे ठेवले

आहे. विश्वासाने मिळालेला आपला ठेवा योग्य व्यक्तीच्या हातात पडलाच पाहिजे ह्याच तळमळीने माझ्यामना ई प्रकाशनाने तयार केलेला हा दिवाळी अंक जो एका क्लिक ने लाखो वाचकांपर्यंत आम्ही पोहचवतो. तोच दिवाळी अंक आपणा सर्वांसाठी प्रस्तुत करतोय .

दिवाळी अंकाच्या कामात वेळोवेळी मदत करणारे माझे सर्व मित्र मैत्रिणी, सहकारी यांचे आभार .

आमच्यावर विश्वास ठेवून आपले अमुल्य साहित्य विश्वासाने आमच्याकडे सुपूर्त केलेल्या सर्व लेखक कवी मंडळींचे आभार.

सर्व वाचक मंडळींचेही शतशः आभार

आपणा सर्वाना दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा !


अनघा हिरे


anagha.hiray@gmail.com


~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~


~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

## अहिंसात्मक पद्धतीने तरुणांनी नोंदविला सामाजिक विचार हत्यांचा निषेध

=================================================



२ ऑक्टोबर २०१३ : गांधी जयंतीच्या निमित्ताने आज डॉ. दाभोलकरांच्या हत्येचा निषेध म्हणून महाराष्ट्र समिती या सामाजिक संघटनेच्यावतीने शेकडो तरुणांनी आज दादर येथे मूक मार्च करून अहिंसात्मक पद्धतीने निषेध नोंदविला. सामाजिक हत्या विचार निषेध मार्चचे आयोजन प्रबोधनकार ठाकरे पुतळा पोर्तुगीज चर्च ते दादर चैत्यभूमी पर्यंत करण्यात आले होते. आज सकाळी ११ वाजता प्रबोधनकार ठाकरे यांच्या दादर येथील पुतळ्याला अभिवादन करून या मूक मार्चला सुरुवात करण्यात आली.

या मार्चमध्ये सामील झालेल्या तरुणांनी मार्च सुरु होण्यापूर्वी सामजिक आशय असलेली गाणी गाऊन समाज विघातक शक्ती विरोधात लढण्याचा निर्धार केला. ह्या मार्चमधील अनेक तरुण हातात महात्मा गांधी, मार्टीन ल्युथर किंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार असेलेले फलक घेऊन चालत होते. मार्चने दादर येथील चैत्यभूमी पर्यंतचा आपला प्रवास पूर्ण केल्यानंतर मार्चच्या समारोपा प्रसंगी सामजिक विषयावर आधारित पथनाट्य सादर करण्यात आले. मार्चच्या अखेरीस तरुणांनी हात उंचावून डॉ. दाभोलकर यांच्या निघृण हत्येचा निषेध करत त्यांच्या हत्येमागे असलेल्या प्रवृत्तीला आव्हान देत सकारात्मक काम करत राहण्याचा निर्धार केला.दिनांक २० ऑगस्ट २०१३ रोजी झालेली डॉक्टर दाभोलकर ह्यांची हत्या ही एका व्यक्तीची हत्या नसून ती समाजाच्या विज्ञाननिष्ठ आणि तर्कनिष्ठ विचार करण्याच्या प्रक्रियेला थांबविण्याकरिता करण्यात आलेली

सामाजिक विचार हत्या आहे. अशा प्रकारे महात्मा गांधी, मार्टीन ल्युथर किंग, सफदर हाश्मी यांच्याही हत्या समाजप्रबोधनाचे कार्य थांबविण्याच्या उद्देशाने कार्यात आल्या होत्या. याच विचारांनी अस्वस्थ होत समविचारी तरुणांनी येत्या काळात  सर्वसामान्य माणसाला सक्षम आणि निर्भय बनविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र समिती या सामाजिक संघटनेची सुरुवात आज महात्मा गांधी जयंतीच्या निमित्तने केली.

महाराष्ट्र समिती ही सामाजिक संघटना

समाजसुधार, लोकशिक्षण,जनजागृती,संघर्ष आणि सत्याग्रह करण्याच्या उद्देशाने वेगवेगळे कार्यक्रम येत्या पुढील काळात राबविणार आहे.

संपर्क –

९७६९६१३९४१ - करण झोंबाडे

९८३३९३५९६१ - गिरीश ढोके

जय हिंद  जय महाराष्ट्र

# मनो-गती.... (अक्षय वाटवे )

==========================================

बऱ्याच दिवसांपासून मनात काही विचार येत होते. आणि एक दिवस अनघाजीं बरोबर बोलणं झालं. बोलता बोलता त्यांन सहज दिवाळी अंकाचा विषय काढला आणि एखादा लेखही लिहायला सांगितला. मी पट्टीचा लेखक नाही, पण त्या रात्री घरी आल्यानंतर कित्येक दिवसांपासून मनात घोळणाऱ्या त्याच विषयाने पुन्हा वर उसळी मारली आणि मग ठरवलं चला, या विषयी आपल्याला जे वाटतं ते लिहून काढू. खरतर दिवाळी अंकासाठीच्या लेखाचा साचा मला अवगत नाही, म्हणून जसं सुचेल तस लिहीत गेलो, किंवा जातोय.

शतकानुशतकं माणसाला आपल्या शरीर बद्दल आणि मना बद्दल कुतूहल आहे. काळाच्या आणि विकासाच्या ओघात हे कुतूहल मागे न पडता अधिकच वाढत गेलं आणि कालांतराने या कुतूहलाचं रुपांतर जिज्ञासेत झालं. या जिज्ञासेला मग विज्ञानाची साथ मिळाली आणि शरीराचा, मनाचा शास्त्रीय अभ्यास, संशोधन सुरु झालं. आजपर्यंत देशाविदेशात झालेल्या संशोधना अंती अनेक वेगवेगळे निष्कर्ष निघाले. एवढचं नाही तर साहित्य, संगीत, कला, श्या जीवनाच्या विविधं अंगानाही याची भुरळ पडली, म्हणूनच की काय सर्वसामान्य माणसाच्या मनोव्यापाराबद्दल बहिणा बाईंना ‘मन वढाय वढाय..’ या ओळी सुचल्या. खरच किती सयुक्तिक आहेत या ओळी. आपलं मन दैनंदिन जीवनात सतत कल्पनेच्या गरुड भराऱ्या घेत असतं. मात्र त्याच वेळी ज्या माध्यमातून या कल्पना मूर्त रूप घेतात ते शरीर शिथिल असतं फार थोड्या लोकांच्या बाबतीत अस घडतं की मनाच्या गती बरोबर त्याच वेगाने त्यांच्या कृतीही गतिशील होतात.

हा विचार जेव्हा मनात आला तेव्हा लागलीच विचारा पाठोपाठ प्रश्नही निर्माण झाला की, असं का होतं ? मग त्या प्रश्नांचं उत्तर शोधण्यासाठी विचारांची मालिका सुरु झाली आणि लक्षात आलं की, मन मुक्त आहे त्याला दिशा, वेळ, काळ, सीमा, प्रांत, जात, धर्म, भाषा कशाचही

बंधन नाही आणि म्हणून त्याची गती अतिशय वेगवान आहे. म्हणूनच की काय जेव्हा एखादी कल्पना मनात असते तेव्हा आपण अनेक प्रकारे विचारांच्या क्लुप्त्या लढवून ती कल्पना मनातल्या मनात साकार करतो. मात्र जेव्हा ती कृतीत आणायची वेळ येते तेव्हा..? तेव्हा आपल्यासमोर अडचणींचे असंख्य डोंगर उभे राहतात. आपल्याच दैनंदिन जीवनात अनेक वेळा आपण एखादी गोष्ट कशी शक्य आहे याचा विचार करण्या एवजी ती अशक्य कशी आहे याचा जास्त विचार करतो आणि काही वेळाने स्वतःलाच हे ठाम पणे पटवून देतो की ती गोष्ट अशक्य आहे.

आता प्रश्न असा उद्भवतो की हे तर सगळे मनाचे खेळ आहेत, मग यात शरीराचा संबंध येतो कुठे? माझ्याही मनात नेमका हाच प्रश्न आला, आणि काही वेळाने एक साधं उदाहरण आठवलं. कित्येक वेळा आपण रात्री झोपताना सकाळी रोजच्या पेक्षा लवकर उठायचं असा निश्चय करून झोपतो. मात्र ७० % वेळा आपण दुसऱ्या दिवशी एकतर रोजच्या वेळीच उठतो किंवा त्यापेक्षा उशिरा. याचं कारण अस की मनाने ठरवलं तरी शरीराला जी सवय लागलेली असते ती बदलत नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी ठरवलेल्या वेळेला मन जागं होतं , देह्वृत्ती जाग्या होतात मात्र शरीर अंथरूण सोडायला तयार होत नाही. कारण सवय.

हे जेव्हा मला जाणवलं तेव्हा लगेचं दुसरा विचार मनात आला की शेवटी शरीरावर नियंत्रण मेंदूचं, बुद्धीचं, विचारांचं म्हणजेच पर्यायाने मनाचं आहे, पण तरीही मनुष्य सर्वस्वी शरीराच्या आधीन आहे. उदाहरणार्थ – अंघोळीला गरम पाणी हवं ही शरीराची गरज आहे. कारण मनाला स्पर्श ज्ञान नाही. पण आपल्याला (जे अंघोळीला गरम पाणी वापरतात) आपल्या शरीराला याची एवढी सवय झालेली असते की आपण ठरवूनही थंड पाण्याचा वापर करू शकत नाही. पण अपवादात्मक परिस्थितीत (उदा. वैद्यकीय सल्ला) आपण शरीराची मुरड घालून थंड पाणी वापरतो. जस की, मधुमेहाचे रुग्ण नाईलाजाने गोड पदार्थ खाण्याचे टाळतात. या वरून अस लक्षात आलं की अरेच्चा आपल्या मनाचे विचार निश्चय पक्का असेल तर शरीर हतबल होऊ शकतं. म्हणजेच आपल्या कल्पना साकार करण्यासाठी आपण आपल्या कमाल शारीरिक क्षमता वापरू शकतो.

मित्रांनो, हा जो विचार माझ्या मनात आला किंवा मी जो या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला. हा विचार, ही कल्पना या पूर्वी कित्येक वेळा,

कित्येक ठिकाणी मांडण्यात आली आहे. पण या लेखाच्या निमित्ताने पुन्हा याला उजाळा देण्याचं कारण एवढचं की आपल्या दैनंदिन जीवनात, धकाधकीत आपल्या मनात आपल्याला जो आनंद मिळवायचा असतो तो केवळ शरीराने नकार दिल्याने  मनातच राहतो. आपल्याला वाचनाची आवड असते पण नोकरीवरून किंवा इतर कामातून सवड मिळत नाही अशी सबब आपण पुढे करतो, आणि यासाठी जबाबदार असतं आपलं शरीर. कारण आपलं मन हे अशा गोष्टींसाठी कायम उत्साही असतं. पण, ‘शरीर थकणे’ या एका सबबी खाली जीवनात आपल्याला आनंद मिळवून देणाऱ्या अनेक गोष्टी आपल्याकडून  करायच्या राहून जातात.

वयो मर्यादेनुसार शरीराच्या कमाल क्षमता कमी होतात हा भाग वेगळा. पण अवघ्या तिशी पस्तीशीत आपलं शरीर आपण चाकोरी बद्ध जगण्यात अडकवून टाकतो हे कितपत योग्य आहे? कदाचित माझं हे विधान १००% सगळयांच्याच बाबतीत खरं नसेल. पण, ज्यांच्या बाबतीत खर आहे त्यांची टक्केवारी सुद्धा काही कमी नाही.

एवढा विचार केल्यानंतर ‘या जगात माणसाला अशक्य अस काही नाही.’ ही संकल्पना पटायला लागली. मग इतिहासात डोकावून पहिलं, तेव्हा लक्षात आलं की, आजवर ज्यांची नावं ठळक अक्षरात लिहिली गेली आहेत त्यांनी त्यांच्या शरीरापेक्षा मनावर आणि मनाच्या कल्पनांवर अधिक भिस्त ठेवली आणि म्हणूनच शरीराची कमाल क्षमता वापरू अश्यक्य गोष्टी शक्य केल्या.

खरचं, एकदा प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे; मनाच्या वेगाने कल्पनांवर स्वर होवून शरीराची गाडी कमाल मर्यादेपर्यत पळवायला..? कदाचित पहिल्यांदा अपघात होईल पण एकदा सराईत चालक झालो की स्वप्नांच्या दुनियेचा पत्ता सहज मिळेल...

akshay.watve@gmail.com
9420260808
Mumbai

~~0~~

## खरी दिवाळी गावाकडचीच!

अँड. प्रभाकर येरोळकर

===========================================================================

आपल्या अनुभवातून जीवनाचा अर्थ
काढणे, सर्वसामान्य निष्कर्ष काढणे किंवा जीवनावषयक तत्वज्ञान मांडणे ही माणसाची सहजप्रवृत्तीच असते. या थोर लेखक गंगाधर गाडगीळांच्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. सध्या साजरी होत असलेली दिवाळी आणि सत्तरच्या दशकातली दिवाळी यात जमीन-अस्मानचे अंतर पडले आहे. आपल्याकडे सतत कुठला ना कुठला उत्सव चालू असतोच, मात्र या उत्सवाचा आण ग्रामीण संस्कृतीचा निकटचा संबंध असतो हे आता आपण ध्यानातच घेत नाही. आपल्याला काय रोजच दवाळी आणि दसरा असे बोलून झाले की, जबाबदारी संपली . पण असे होत नसते. आमच्या लहानपणी दिवाळीला गावाकडे जाणे बंधनकारक असे. कित्येक काय परंतु वर्षानुवर्षे ही परंपरा चालूच होती. दिवाळीचा अर्थच मुळी तो असायचा. घरातीलच नव्हे तर गावातीलही सगळ्यांनी एकत्र जमायचे. माणसे नोकरी, व्यवसायानिमत्त कुठेही असली तरी दिवाळीला गावाकडे जमत. कुणाच्या घरी कोण आले, कोण आले नाही याची खबरबात सगळ्यांना असे. त्यावेळी मोबाईल , फोन्स नव्हते. मात्र एकाच्या घरातली बातमी दुसरीकडे समजण्याची एक नव्हे तर अनेक माध्यमे उपलब्ध होती. आणि ती सारी जवंत होती; एकतर सकाळी उठल्याबरोबर जंगमलोक रोज पीठ मागायला येत. लहान असतानाचे मला चांगले आठवते. सकाळी तासभर मी पीठ वाढायच्याच कामावर बसलेला असे. एखाद्या दिवशी ते आले नाहीत तर आमची आजी अस्वस्थ व्हायची. कारण गावात हमखास कुणी तरी

गचकलेले असायचे.दिवाळीत कोण आले, कुणाच्या घरी कोण नाही अशी जंगम चौकशी करीत असे.शिवाय परटीण असेच. दुपारच्या वेळेला बारा बलुतेदारांपैकी सुतार, नाव्ही अशा मंडळीचा तर नेहमीच राबता असायचा. सर्वाचेच आपुलकीचे आणि जव्हाळ्याचे संबंध असत. शाळेत जाताना किंवा येताना लोहाराच्या भात्याजवळ तासन्तास बसून त्याचे काम कुतुहलाने बघत बसलेले मला आठवते. नळी फुंकली सोनारे,इकडुन तिकडे जाई वारे; अशी कुठलीही म्हण नंतर माहित झाली.पण सोनारांचे काम कसे चालते ते प्रत्यक्षात तथे बसून आम्ही पाहलेले आहे.त्या काळात गावात हेअर कटींग सलून्सची भानगड नव्हती. नाव्ही घरीच येत असे. तोही आमचा विरंगुळ्याचा असा औत्सुक्यपूर्ण काळ असावयाचा. सगळ्या गावातल्या गुजगोष्टी तिथे कळायची सोय होती. दिवाळी दरम्यान पंचांग सांगायला ब्राम्हणही असेच. त्यांच्याही झोळीत काहीना काही टाकावे लागे.एकादशी कधी, द्वादशी कुण्या वारी, आमावस्या किती वाजा सुरु, भाऊबीज कशी या वर्षी लांबली; अशा गोष्टी आम्हाला त्यांच्याकडुनच कळत. गाव संपर्काची माध्यमे एवढय़ावर थांबत नसत; तर संध्याकाळी हलक्या शिंग्याची स्वारी असेच.कंदलाच्या उजेडात शिंग्याला रोटी वाढा जी अशी हाळी हमखास ठरल्या वेळी येई. ती एखाद्या दिवशी नाही आली की आजी गडय़ाजवळ चौकशी करीत असे.एक-दोन दिवस सलग असे कुणी रिवाजानुसार आले नाही की, गडय़ाला किंवा अन्य कुणाला किंवा मलाच त्यांच्या घरी चौकशी करण्यासाठी पाठवून देत असे.दिवाळीचा उत्सव असला तरी या सर्व मंडळीच्या सहभागाशिवाय त्याची कल्पनाच करणे शक्य नव्हते. साधा फराळ असला तरी सर्वाचाच सहभाग त्यात राहायचा.दिवाळी म्हणजे ग्रामसंस्कृतीचाच एक अविभाज्य भाग होता. आता ती संस्कृतीच उरली नाही, तर मग दिवाळी कसली? वाडय़ातच गोठा असे. संध्याकाळी

जनावरे घरी येत. तो क्षण मोठय़ा औत्सुक्याचा असे. दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळी..या चिरपरिचित ओळी त्यांच्यासाठीच तर होत्या. गायी म्हशींसोबत गुराखी आलाच. आणलेल्या फटाक्यांपैकी काही फटाके आमच्या गुराख्याला मिळाले की मगच आम्ही ते उडवायला सुरु करीत असू. गावात लक्ष्मीपुजनाला आणि पाडव्याला पानसुपारीला लोक बोलावत. जेवढी म्हणून काही दुकाने असत किंवा नव्याने उघडीत तिथे सगळीकडे भेट द्यावी लागे.दिवाळी म्हटले की वाजंत्री आलेच. बँड वाजल्याशिवाय खऱ्या अर्थाने दवाळी आहे असे वाटायचेच नाही. दारात दुपारच्या वेळी बँड वाजला की, आम्ही सारे शेजारपाजारच्या मुलांसहत जमत असू. नंतरही गल्लीत बँडच्या पुढे-मागे किंवा सोबत काही काळ मिरवत चालणे ही आमची चैनच असायची. संस्कृती म्हणजे नेमके काय हे मुळातून समजून घेणे तसे सोपे नसते. ती अनुभवायलाच हवी. आता गावात

हेअर कटींग सलून झालेत. कारण नसताना मोबाईल्सचा सुळसुळाट झाला आहे. गरज नसताना निरनिराळ्या कंपन्यांचे टॉवर्स उभे राहले आहेत. घरातले गोठे आतागावाबाहेर शेतात गेले आहेत. तर काहींना ते नकोच आहेत. त्याऐवजी डीशअँटेनाच्या छत्र्या उगवल्या आहेत. घरातली माणसे एकमेकांना भेटण्याऐवजीमोबाईलवरुन शुभेच्छा देऊ लागली आहेत. तेही उपचार म्हणून! आपल्या गायीम्हशी, वासरे किती याऐवजी टी.व्ही. वर चॅनल्स कोणती दिसतात याची आताचर्चा होते.

गावातल्या बसस्टॅण्डवर इतर सोयी कुठल्या नका का असेनात पण पेप्सी, थम्सअप, बिसलेरीच्या बाटल्या मिळतात. मग दुसरे काय होणार? पूर्वी लोक एकमेकांची विचारपूस करीत. सुख-दुःखात सहभागी होत. जवळीक होती, जिव्हाळा होता. पुर्वीही लोक दारु पित. पण दारुडय़ा कोण ते साऱ्या गावाला माहित

असे. लोक त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत. त्याचे काय मनावर घ्यायचे म्हणून गावात कुणाचा तरी नक्कीच धाक असे. वाटेल तसे वागायची मोकळीक कोणालाहीनव्हती. काही संकेत होते, रुढी होत्या. परंपरा, चालीरिती असे सगळे सगळेअस्तित्वात होते.

ग्रामसंस्कृतीचा डोलारा कोसळला आणि मग चांगल्या परंपरा, रुढी, जिव्हाळा नष्ट होत चालला. गावातली पहाट उगवायची ती मोरांच्या मंजुळं केकावलीने . रात्रभर चालू असलेल्या व संपत आलेल्या भजनांनी व अभंगांनी प्रसन्नसुर्योदय व्हायचा. नष्ट होत असलेल्या ग्रामसंस्कृतीचा न सध्या थांबायचे नाव घेत नसलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा घनिष्ठ संबंध असल्याचे माझे तरी ठाम मत आहे. लोकांचा आपसांतला संवादच हरवत चालला आहे. लोकपूर्वी एकमेकाला धरुन होते. त्या बलुतेदारी पद्धतीचा समावेश असणारी गाव संस्कृतीच त्याला कारणीभूत होती. गावातले प्रश्न गावातच मिटवायची क्षमता होती. पेरणीसाठी किंवा खतासाठी कुणी अडून बसण्याची प्रथा नव्हती. अगदी एखाद्याच्या शेतात पिकले नाही तर इतरांच्या कणगीतले धान्य हात घालून नेण्याची मुभा होती, हक्कदेखील होता.आज आपण हा सारा चांगुलपणा विसरत चाललो आहोत.

मो. 9860455785

अॅड. प्रभाकर येरोळकर

~~0~~

## प्रश्न आणि प्रश्न (प्रदीप ओक)

==================================================================

काही लोकांना खूप प्रश्न पडतात! त्यातल्या काहीना
त्यामुळेनवे शोध लागतात, तर काहींना नवे प्रश्न पडतात.काही जण उत्तरे टाळण्या
साठी प्रतिप्रश्न करतात.
काही जण जबाबदारीतून पळवाट शोधण्यासाठी प्रश्न
विचारतात.शाळेमध्ये जसे शिक्षकांनी प्रश्न विचारणे अपेक्षित असतेतितकेच किंवा
त्या पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी ते विचारणेआवश्यक असते.काही वेळा काही जण
आपली बुद्धिमत्ता सिद्ध करण्यासाठी प्रश्नांची सरबत्ती करतात. प्रश्न विचारून
गोंधळात पाडून आपले वर्चस्व सिध्द करण्याची सवय तर अनेकांना असते. तर
काही जण नुसते प्रश्नच घेऊन जगत असतात. त्यांचे
जीवन हाच एक कूटप्रश्न झालेला असतो. उत्तरे सापडतनाहीत त्यामुळे प्रश्नांचा निच
रा होत नाही! ते साठतचजातात आणि मग त्यांचे ओझे आयुष्यभर वाहत वाहतशे
वटच्या मृत्युच्या तर्क संगत अवस्थेप्रत पोचतात आणिसंपतात त्यांच्या प्रश्नांसक
ट! मग काही वेळा प्रश्न पडतो कि प्रश्न विचारणे चांगले कावाईट?
सर्वच जाणकार म्हणतात कि, प्रश्न पडणे ही एक नैसर्गिकप्रक्रिया आहे.
आपला मेंदू प्रश्नांच्या वळ्या पडत समृद्ध होत असतोबहुदा! असे म्हणतात की मेंदू
ला जितक्या वळ्या जास्ततितकी जास्त प्रगल्भता, बुद्धिमत्ता असते. ती कदाचित
प्रश्नांमुळे आणि मिळालेल्या उत्तरांमुळे वाढत असेल.जन्माला आल्या बरोबर आप
ण कुठे आहोत हा प्रश्न पडतोआणि पाय पकडून उलटे धरणाऱ्या सुईणीकडे किंवाडॉ
क्टर कडे पाहून पहिला प्रश्न पडतो!त्याला भाषा नसते!पाठीवर थापटी मारून जे उत्त
र मिळते, त्याला भाषा नसतेपण अर्थ असतो. ती थापटी सांगते,
'सरळ पणे जगायचे असेल तरजगाकडे उलटे पहा!'.

या विचित्र उत्तराने रडू फुटते आणि त्यामुळे सगळ्यांच्याचेहऱ्यावर हसू फुटते.मग पालथे पडायला शिके पर्यंत, उताणे पाडून,पाळण्याच्या वर टांगलेल्या चांदव्या मध्ये लोंबणारे चिमणीकावळे पाहत पडलेले प्रश्न



डोळ्यात कुतूहलाच्या रूपानेचमकत असतात.

पाळण्यात डोकावून पाहणारे प्रश्न विचारात असतात,'कोणआहे?
ओळखले का? मी तुझी किंवा तुझा काका, मामा, आत्या, भाऊ,
बहिण वगैरे वगैरे.......!
हसतोयकशा, ओळखून! काय झाले,ललायला..???????'

शब्द कळत नसतात, भाव समजू लागतात. तसे नवे प्रश्नउभे राहतात. मग भाषा मिळते, घराच्या सीमा ओलांडूनआपल्या पायावर बाहेर पडल्यावर पुन्हा प्रश्न! प्रत्येकप्रश्नाचे समर्पक उत्तर मिळतेच असे नाही. पण,जगरहाटीच्या दबावाखाली ते अनुत्तरीत प्रश्न तसेच राहतात.विचारणाऱ्याला धमकावले जाते. 'प्रश्न विचारू नको, मीसांगतोय न, तसेच कर!' हे म्हणणारा देखील त्याअनुत्तरीत प्रश्नांचे ओझे वहातच असतो. कारण त्यानेजीवनाचा सोपा मार्ग स्वीकारलेला असतो. उत्तर शोधीतबसत नाही. बहुसंख्य असेच असतात, प्रवाह पतीत, मळलेल्या वाटेने जाणारे!पण मग असेही लोक असतात ते तो प्रश्न घेऊन फिरतराहतात. 'तुम्ही म्हणता म्हणून का? तसेच का? मीम्हणतो तसे का नाही?' रीतींच्या चौकटी बाहेर पडतात.नवा मार्ग शोधू लागतात! अशांना समाजा कडूनउत्तरेमिळतातच असे नाही. बहुधा दुरुत्तरेच मिळतात. त्यातूनदेखील उत्तरे मिळालीच तर त्यांनी त्यांचे समाधान होत नाही. मग हाता मध्ये मशाल घेऊन ते आपल्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागतात. सापडलेल्या उत्तरांनी ते प्रवाह पतित समाजाला दिशा दाखविण्याचा प्रयत्न करतात.

त्यांच्याजवळ सगळ्याच प्रश्नांची उत्तरे असतात असे नाही पणत्यांच्या जवळ असे काही प्रश्न असतात ज्याची उत्तरेदेण्याची क्षमता कोणात नसते. त्यामुळे त्यांच्या

मागे लोकउभे राहतात. या शोधामध्ये समाजाच्या चौकटी मोडल्याजातात, रुढींचे अवडंबर झुगारून देऊन नव्या रुंदावलेल्याचौकटी बांधल्या जाऊ लागतात.पुन्हा प्र श्न! चौकट किती रुंद करायची? हा प्रश्न विचारणारा नवा कोणी तरी पुढे होतो! जुन्या लात्याचे उत्तर माहित नसते. त्याच्या दृष्टीने त्याने त्याला हवेते उत्तर मिळविलेले असते. आता संघर्षाची ताकद संपलेलीअसते. मग आपल्या हातातील मशाल न व्या प्रश्नकर्त्याच्याहाती सोपवून ते थांबतात! कधी आपण होऊन थांबले नाहीत तर थांबविले जातात. नव्या वाटेच्या वळणावर त्यांचे पुतळे उभे केले जातात , सत्कार होतात, गळ्यात हार पडतात आणि त्यांचा प्रवासथांबतो!समाजाच्या चौकटीची मापे सतत बदलत राहतात. आणि ती बदललीच पाहिजेत. अशी चौकट रुंदावण्यास मनाई करणारा समाज स्थिर होतो. आळसावतो.
त्याला प्रश्नच पडत नाहीत! जुनी छापील प्रश्नोत्तरे रोजघोटत राहिल्याने पाठ झाले ली असतात.
प्रश्न पडला नाही की ज्ञानाची गंगा थांबते.ती थांबली की त्याचे तळे बनते.अजून जा स्त वेळ थांबली की डबके होते.प्रश्न संपलेला समाज म्हणजे या डबक्यातील किडे. म्हणून मित्रांनो सतत प्रश्न विचारीत राहा!स्वतःला, समाजाला, प्रस्थापितांना आ णि बंडखोरांनादेखील ! प्रवाहित रहा आणि जिवंत राहा!

प्रदीप ओक

~~0~~

*लोकाकडे पाठ फिरवून उभे प्रशासन*........ अँड. प्रभाकर येरोळकर

---

आपला देश बेरोजगारीचा विस्फोट होण्याच्या उंबरठय़ावर उभा आहे. हजारोंच नव्हे तर लक्षावधी बेरोजगारांचे तांडे नोकरीच्या, रोजगाराच्या शोधात वणवण भटकत आहेत. याच आठवड्यातली एक बातमी बघा. एका जिल्हय़ात म्हणजे मराठवाड्यातल्याच लिपीक व शिपाई भरती जाहीर झाली. जागा किती तर अवघ्या ३५ आणि त्यातील ३१ जागांकरिता ५ हजार ५३१ उमेदवार लिपीक म्हणजे कारकून पदासाठी तर उर्वरित चार, शिपाईपदाच्या जागेकरिता एक हजार ६४१ उमेदवार, एवढय़ा प्रचंड संख्येने अर्ज आले. परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवावा लागला.

म्हणजे ३५ जागांकरिता ७ हजार १७२ अर्ज आले आणि माझी खात्री आहे की, या साऱ्या अर्जांची छाननी केली तर अर्जदारांमध्ये बी.ए., एम. ए., एम. कॉम., एल.एल.बी. अगदी इंजिनियर्स देखील असणार. शिकलेल्या लोकांना नोकरी नाहीत, न शिकलेल्यांचा तर विचारच करू नये. एकीकडे अशी भयावह अवस्था तर दुसरीकडे जी मंडळी प्रशासनात विविध खुर्च्या अडवून बसलेली आहेत ती आपले कर्तव्य बजवायला आणि लोकांची कामे करावयास तयार नाहीत. काही अपवाद असू शकतात, पण ते अपवादच! परंतु स्वातंत्र्यप्राप्त होऊनही एवढा मोठा कालखंड उलटला पण अजूनही आपले प्रशासन लोकांकडे पाठ फिरवून उभे आहे. ही परिस्थिती

बदलणार कधी? प्रशासनावर कुणाचा धाक नाही. वचक नाही. कामचुकार आणि आळशी कर्मचारीवर्ग आणि संवेदनहीन अधिकारी हे असं का होतं?

कधीतरी एक वेळ येणार होती आणि ती आलीय, आता, ती अशी की, नोकऱ्यातील सुरक्षितता कमी करणे. काम करा नाही तर घरी बसा. हजारो, लाखो लोक जे तुमच्यापेक्षा अधिक शिकलेले आहेत आणि ज्यांना कामाची गरज आहे, ते लोक तुमची जागा घेण्यास सज्ज आहेत, यांचा विचार करा. कल्पना करा. एखादी मोठी कंपनी आहे, खासगी व्यवस्थापन आहे. तिथं कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना काम करावे लागते. हलगर्जीपणा करून अजिबात चालत नाही. कामचुकारपणा केला तर सरळ वेतनात कपात होते. दिलेले काम वेळेत पूर्ण नाही झाले तर सरळ नोकरीवरून काढले जाते. कारण त्यांना कंपनी नफ्यात चालवायची असते. विकसित राष्ट्रात सरकारी कर्मचाऱ्यांना असेच वागविले जाते.

आपल्यासारखी अवाजवी सुरक्षितता नसते. त्यामुळे होते काय, तर कार्यक्षमता वाढीस लागते. आपल्याकडे कार्यक्षमता हा प्रकारच प्रशासनात उरलेला नाही. उलट भर कशावर दिला जातो, तर लोकांची अडवणूक करण्यावर. ही अडवणूक संपूर्णपणे संवेदना हरवून बसलेले प्रशासन कशा प्रकारे करते, याचे एक ताजे उदाहरण मी आता सांगणार आहे. पावलो कोयलो नावाचा एक प्रसिद्ध लेखक आहे आणि कुठल्याही लेखात आपला मुद्दा अधिक स्पष्ट करून सांगण्यासाठी तो एका गोष्टीचा आधार घेतो. मीही

अशाच एक घडलेली गोष्ट गेल्याच आठवड्यातली सांगणार. ती खालीलप्रमाणे. एका शेतकऱ्यांने आपली जमीन तलावात संपादित झाली म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात वाढीव नुकसानभरपाई मिळावी म्हणून कलम २८ खाली अर्ज केला. त्यासाठी त्याच तलावातील इतर लोकांच्या संपादित जमिनीसंदर्भात संबंधित न्यायालयाने जो निकाल दिला त्याचा त्याने आधार घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन विभाग (लघु पाटबंधारे) यांच्याकडे हे प्रकरण प्रलंबित होते. निर्णय काही होईना, कारण न्यायालयातील निकालाचे शासनाने अपील हायकोर्टात केले होते. म्हणून अपिलाचा निकाल लागेपावेतो आम्ही काही करणार नाही, अशी पहिली अडवणूक सुरू झाली. बिचाऱ्या शेतकऱ्याने पटवून दिले की, जरी अपील चालू असले तरी त्या निकालाप्रमाणे भरपाईचे वाटप झालेले आहे; परंतु ऐकतो कोण? मग शेतकऱ्याने डायरेक्ट हायकोर्टात धाव घेतली आणि हायकोर्टाने तत्काळ निर्णय दिला की, शेतकऱ्याचे प्रकरण दोन महिन्यांत निकाली काढा. मग मात्र प्रशासन हालले आणि स्वत: आयएएस कलेक्टरांनी लक्ष घालून त्या प्रकरणातील नुकसानभरपाईचे अवॉर्ड मंजूर केले. एवढे झाले पण शेतकऱ्याच्या पदरात रक्कम कुठे पडतेय? संबंधित इंजिनिअरच्या मध्यम प्रकल्प विभागाकडून रक्कम मागविण्यास टाळाटाळ सुरू झाली.

एकूण काय तर अडथळय़ाची शर्यतच लागली. जिल्हाधिकारी कार्यालयातच एक समन्वयक नावाचा विभाग काही सालापूर्वी

स्थापन झाला. त्याआधी कामे थोडी पटापट व्हायची; पण आता आणखी एक अडवणुकीचे केंद्र आले. जेवढी टेबल जास्त तेवढी अडवणूक जास्त. म्हणजे भूसंपादन ते व्हाया समन्वयक विभाग ते मध्यम प्रकल्प अभियंता ते गोदावरी का कृष्णा महामंडळ आणि गरजेनुसार मंत्रालय. पुनः तिथून त्या कागदाचा वापस प्रवास सुरू. शेतकरी अक्षरशः रडकुंडीला येणे साहजिकच होते. अखेर महाप्रयासाने म्हणा की, त्या शेतकऱ्याची वा त्याच्या पूर्वजांची काही पूर्वपुण्याई म्हणा, पण ते पेमेंट आले. मध्यम प्रकल्प अभियंता खात्याकडून ते पेमेंट भूसंपादन विभागाकडे जमाही झाले आणि शेतकऱ्यांची ससेहोलपट एकदाची थांबली असे वाटू लागतानाच त्याला पेमेंट काही मिळेना. वेतनवाढीचा लाभ भोगणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांना त्या शेतकऱ्याच्या अडचणी व वेदना कळाव्यात तरी कशा? चौकशी करता कळाले की, त्या भूसंपादन खात्याचा कारभार पुनर्वसन खात्याकडे सोपवला गेलाय. पुनर्वसन अधिकाऱ्याला भेटावे तर ते ऑफिसच निरस्त झाले. तालुक्याच्या उपजिल्हाधिकाऱ्यांकडे हालवलेय; पण ते पेमेंट तुमच्याकडे जमा होऊन महिना झाला. ते तरी द्या. यावर अधिकाऱ्यांचे म्हणणे की, अहो, चाळीस वर्षांतून एकदा अशी स्थिती उद्भवते. आम्ही भोगलंय ते सगळं. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात ऑफिस गेलेलं.

अहो, तुम्ही फाईली का पाठवत नाही, मग कमीत कमी? अधिक चौकशीअंती कळाले की, ती फाईलच सापडत नाही. व्वारे प्रशासन!

अर्ज घेऊन गेलं तर भूसंपादन खाते म्हणजे तिथले कर्मचारी म्हणणार, आम्ही घेणार नाही. पुनर्वसनवाले म्हणणार, आम्ही तो अर्ज का घ्यावा? हा खेळखंडोबा बघून हवालदिल झालेल्या शेतकऱ्याला घेऊन कलेक्टरांकडे तक्रार देण्यास गेलो. ते दौऱ्यावर असल्याचे कळाले म्हणून निवासी जिल्हाधिकारी यांचेकडे गेलो. त्यांच्याशी झालेला वार्तालाप खालीलप्रमाणे.

फायली पाठविण्याचे काम चालू आहे. मी एकदा त्या विभागात गेलो होतो तर ते चालू होते.परंतु हायकोर्टाचा आदेश असलेली आणि चालू फाईल, दोन महिने झाले तरी सापडत नाही, मग आम्ही करायचे काय?

दोन महिने नाही. दीड महिना झाला ते ऑफिस उठून, तुम्ही चुकीची माहिती सांगताय. त्या अधिकाऱ्यांचे बोलणे ऐकून आम्हालाच पश्चाताप वाटू लागला.

अहो, दीड तर दीड महिना! पण तुम्ही सांगत का नाही कर्मचाऱ्यांना फाईल हुडकायला?

काय करायचे आता, उपोषणाला बसायचे की हायकोर्टात जावे? इंग्रज बरे होते म्हणायची वेळ आली खरं!

~~~~~
~~~~~

## *कुटुंबपद्धतीची आवश्यकता ......* – सुधाकर देवकुळे -

-----------------------------------------------------

मानवाने सुगम जीवनासाठी अंगीकारलेली व्यवस्था ती कुटुंबपद्धती .मानवाच्या मुलभूत गरजा .. अन्न – वस्त्र – निवारा .. साधून सामाजिक व्यवस्था देखील भयमुक्त राहील या भावनेतून ही व्यवस्था जन्मास आली . कालांतराने परिस्थितीजन्य कारणांनी , सुरुवातीच्या व्यवस्थेत अनेक बदल वेळोवेळी होवून, आपण पाहिलेली – ऐकलेली अथवा वाचलेली , एकत्र कुटुंबपद्धती जन्मास आली जगाच्या अनेक देशात व आपल्या भारतात देखील अनेक भागात एकत्र कुटुंबपद्धतीचे अस्तित्व अजूनही आहे . सामान्यतः या पद्धतीसाठी आवश्यक आहे , जीवनास जरुरी विपुल अन्नपुरवठा – जरुरी अर्थार्जन – निवाऱ्यासाठी जरुरी जागा – सुरक्षितता आणि कुटुंबातील प्रत्येक घटकाची एकमेकांविषयीची आत्मीयतेची भावना .

सुनियंत्रित समाजव्यवस्थतेसाठी – नियंत्रणेसाठी ही पद्धती अतिशय उपयोगी आहे ..-वृद्ध व्यक्तींचे संगोपन , त्यांच्या गरजा , आरोग्य व आधार , या पद्धतीत अतिशय सुलभ होतो .

-कुटुंबातील शारीरिक खोड व दीर्घ आजाराच्या व्यक्ती यांची देखभाल सरळ होते .

-कुटुंबातील अविवाहित स्त्रिया ,विधवा ,त्यक्ता अशा निराधार स्त्रियांना आधार मिळतो .

-कुटुंबातील बाळगोपाळ व किशोरवयीन मुलांच्या शारीरिक – मानसिक आरोग्याच्या गरजा ,शिक्षण , संस्कार व इतर जरुरींकडे लक्ष्य पुरवणे सोपे जाते .

-कुठल्याही एका व्यक्तीवर कामाचा बोजा न पडता , जाबाब्दार्याचे विभाजन होवून ,प्रत्येक व्यक्तीस जीवन जगण्यासाठी मोकळा वेळ मिळतो .

-आयुष्यातील बऱ्या-वाईट प्रसंगांना संभाळणे सोपे जाते .
-साधन-संपत्तीचे विभाजन न होता , वृद्धीस मदत होते .
एकत्र कुटुंबपद्धती महदंशी चालू राहिली असती , तर अनेक सामाजिक दूषणं , टाळता आली असती , अथवा त्यांवरील अंकुश सहजसाध्य झाला असता .आजच्या समाजातल्या अनेक कठीण व दुर्गम समस्या उद्भवल्याच नसत्या .अनेक प्रकारच्या संस्थांची गरजच भासली नसती .समाज आर्थिक – नैतिक – सांस्कृतिक पातळींवर अधिक सक्षम झाला असता .
या कुटुंब पद्धतीच्या नाहीसे होण्याने अनेक दूषणे समाजात निर्माण झाली ,
-अनेक प्रकारच्या आर्थिक-शारीरिक-मानसिक-भावनात्मक विकृती निर्माण झाल्या ..... स्त्रियांवर सर्व प्रकारचे अत्याचार होऊ लागले ,
-व्यक्तींची स्वकेंद्रित विचारशैली विस्तृत पावली ,
-समाजात आर्थिक गुन्हे , खून मारामार्या जातीवाद – धर्मांधता – राजकीय अस्थिरता , अशा प्रकारच्या –मानसिक व आर्थिक अस्वस्थेमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या ,
-व्यक्तींची परस्पर आत्मीयता , ओलावा , प्रेम , आदर कमी-नाहीसे होऊन , असुराक्षतेचे वातावरण निर्माण झाले .
अशा अनेक समस्यातून निर्माण झालेली ,अति भयानक व असुरक्षित जीवनशैली जगणे नशिबी आली .
या सर्वात भर म्हणून की काय : शहरांची होणारी अमर्याद वाढ, ग्रामीण भागात होणारी अर्थार्जनांच्या साधनांची घट ,अशा अनेकविध कारणांमुळे कुटुंबसंस्था हा प्रकारच नष्ट होत चालला आहे .यावर उपाय ????.
सुधाकर देवकुळे .
~~0~~

# साउथ आफ्रिका संस्कृती(!!).....अनिल गोविलकर

=============================================

एखाद्या देशात साधारणपणे, ५ वर्षे राहिले की सर्वसाधारण समाजाची कल्पना येऊ शकते. साउथ आफ्रिका, स्पष्टपणे, ४ समाजात विभागाला आहे. १] काळे (मूळ रहिवासी), २] गोरे (जवळपास ३०० हून अधिक वर्षे वास्तव्य), ३] भारतीय वंशाचे (नुकतीच १५० वर्षे पूर्ण झाली!!) ४] कलर्ड ( मिश्र संयोगातून जन्मलेला समाज). अर्थात, माझ्यासारखे नोकरीसाठी येउन स्थायिक झालेले तसे बरेच आहेत पण एकूण लोकसंख्येच्या मानाने, अजूनही प्रमाण नगण्य आहे. दुभंगलेली कुटुंबव्यवस्था, हे इथल्या बहुतेक सगळ्या समाजाचे व्यवच्छेदक लक्षण मानावे लागेल. जहाजाला कुठे भोक पडले आहे आणि किती प्रमाणात जहाजात पाणी शिरत आहे, याचा पत्ता लागत नाही!! लग्नसंस्था अजून अस्तित्वात आहे, हेच भाग्य!! माझा, इथल्या समाजातील काही लोकांशी जवळून संबंध यायला लागल्यावर, हळूहळू चित्र स्पष्ट व्हायला लागले. सुरवातीला माझ्यावर भारतीय संस्कार स्पष्ट असल्याने, इथल्या मानसिकतेबद्दल बरेच आश्चर्य वाटायचे. नंतर, जसा जवळून संबंध यायला लागल्यावर, भरजरी वस्त्रावरील वर्ख उडून आतील अस्तर दिसायला लागावे, त्याप्रमाणे इथले समाजमन ध्यानात यायला लागले.

गोरा समाज, तुमच्यापासून पहिल्यापासून थोडासा फटकून वागत असतो. काळ्या लोकांपासून तुम्हीच जर दूर असता, तर मुळ भारतीय वंशीय लोक, त्यातल्या त्यात, तुमच्या जवळ येऊ शकतात. कलर्ड समाज तर बहुश: त्यांच्याच विश्वात रममाण झालेले असतात. असे जरी असले तरी संस्कृती

म्हणून बघायला गेले तर सामायिकता आढळते. मी, १९९४ साली प्रथम तिकडे गेलो. अर्थात, त्यावेळेस, मी, साउथ आफ्रिकेतील चौथा महाराष्ट्रीयन माणूस!! इथे भारतीय समाज, १] तमिळ/तेलगु, २] हिंदू/गुजराती, मुसलमान अशा ३ भागात विभागाला गेला आहे. आता हिंदू म्हणजे, त्यात उत्तर भारतीय, गुजराती,बंगाली सगळे येतात. अर्थात, या विभागणीनुसार देवळे, राहणीमान इत्यादी गोष्टींत फरक पडतो. भाषा अर्थात इंग्रजी. तेंव्हा या समाजातील काही गमतीजमती, उदाहरणासहीत लिहिण्याचा प्रयत्न. खरे तर गमतीजमती हा शब्द बरोबर नाही कारण थोडी तठस्थ वृत्ती ठेवणार आहे. माझ्या पहिल्याच नोकरीत बरेचसे भारतीय वंशाचे लोक ओळखीचे झाले. माझ्या विभागात सुरवातीला, नसिमा म्हणून मुसलमान मुलगी/स्त्री (लग्न झालेले म्हणून) होती. वागायला मोकळेपणा आणि मुळात मी मुंबईहून आलो, याचे औत्स्युक्य!! माझ्या महितीतील, हीच एकमेव मुलगी, जिचे लग्न अजूनपर्यंत तरी टिकलेले आहे. आमच्या बऱ्याच विषयावर गप्पा व्हायच्या. एक गंमत मी वारंवार अनुभवली आहे. मी, मुंबईतील, हे समजल्यावर लगेच प्रश्न यायचा, " अमिताभ/शाहरुखला ओळखतोस का??" पहिल्यांदा हसायला यायचे पण, इथे इतका भोळसटपणा सर्रास दिसून येतो. जणू एकाच शहरात राहतो म्हणजे आमच्या भेटीगाठी नेहमीच्याच!! याचे मुख्य कारण, वर्णभेद राज्यव्यवस्थेने इथल्या समाजाला इतर जगापासून वंचित ठेवल्याने, सर्वसाधारण वृत्ती हि अशीच राहिली. आता थोडाफार फरक पडला आहे. हळूहळू जशी ओळख वाढली, तशी एकदोनदा घरी जेवायचे निमंत्रण मिळाले इथे गंमत पाहायला मिळाली. ऑफिसमध्ये वागण्या/बोलण्यात जो मोकळेपणा असायचा, त्याची नामोनिशाणीदेखील, तिच्या(च) घरी दिसत नव्हती. हाताची घडी आणि तोंडावर बोट!! मलाच

कंटाळा आला. कितीही झाले तरी, तिच्या नवऱ्याशी काहीही ओळख नाही, त्यामुळे बोलण्यात अवघडलेपण सतत असायचे!! नंतर लक्षात आले की, टिपिकल मुस्लिम संस्कृती!! मानसिक दुभंगलेपण इथे जे दिसले, ते मला नंतर पुढील १७ वर्षात वारंवार इतर घरांत आढळले. याच ऑफिसमध्ये, फरझाना म्हणून मुस्लिम युवती भेटली. वागायला अतिशय मोकळी, अगदी नको तेव्हढी!! तेंव्हा तिचे लग्न झाले नव्हते परंतु बिनधास्त वृत्तीने ती, दुसऱ्या मुस्लिम माणसाबरोबर राहत होती!! त्याच्यावर तिचे प्रेम होते/आहे. नंतर मला समजले की शरीरसंबंध देखील ठेवला होता. आता त्याच्याच बरोबर तिचे लग्न झाले आहे. हि, मी बघितलेली पहिली मुस्लिम युवती, जी उघडपणे नाईट क्लबमध्ये नाचायला जायची, क्वचितप्रसंगी "स्मोकिंग"देखील!! धक्कादायक भाग या पुढे आहे. २००४ मध्ये तिचे रीतसर लग्न झाले परंतु, त्याच्या प्रियकराची नोकरी गेली आणि एकदम हे कुटुंब उघड्यावर आले. धक्कादायक बाब अशी की तिच्या नवऱ्याने तिला "बाजारात आणले!! अगदी उघड नाही परंतु "सोसायटी गर्ल" या नावाने प्रतिष्ठित वर्गात ती मिसळू लागली!! अर्थात, हे सगळे सुरु झाले, तेंव्हा एकदा मी पीटरमेरित्झबर्ग शहरात, असाच जुन्या मित्रांना भेटायला आलो असताना, अचानक फरझाना मला भेटली. वास्तविक कसे बोलायचे, याचा मला संकोच वाटत होता पण, जुन्या मैत्रीच्या आधारावर तिने कसलाही आडपडदा न ठेवता तिचे आयुष्य मला सांगितले!! पीटरमेरित्झबर्ग हे माझे साउथ आफ्रिकेतील पहिले शहर, नंतर, नोकरीनिमित्ताने, डर्बन, रस्टनबर्ग, Standerton, प्रिटोरिया आणि जोहानसबर्ग इथल्या शहरात वास्तव्य झाले.प्रत्येक शहरात वेगवेगळे "नमुने" अनुभवायला मिळाले. इथेच मला पुढे "हिंदू" समाजातील मुली बघायला मिळाल्या

पीटरमेरित्झबर्ग इथल्या कंपनीचा व्याप वाढायला लागला तशी नवीन भरती आवश्यक झाली. त्यानुसार, माझ्या विभागात आधी "बेटी" नंतर "ज्योती" नावाच्या मुली कामाला लागल्या आणि मला इथल्या भारतीय समाजाची खरी ओळख मिळाली!! वास्तविक, या दोन्ही मुली, त्यावेळेस विशीतील किंवा एखाद वर्षे इकडे/तिकडे, याच वयोगटातील. आमचे बोलणे अर्थात इंग्रजीतून. माझे इंग्रजी म्हणजे भारतीय (ब्राह्मणी!!) तर इथले संपूर्ण पाश्चात्य!! सुरवातीला माझी फार पंचाईत व्हायची. काही उच्चाराला, लोक नाक मुरडायचे! परंतु नंतर मी जाणीवपूर्वक उच्चार सुधारले. आता, हि "बेटी", अजूनही सुस्वरूप, बुद्धीने तल्लख परंतु चारित्र्याने हलकी!! जेंव्हा माझ्याबरोबर काम करायला सुरवात झाली तेंव्हा तिची "एंगेजमेंट" झाली होती. लवकरच तिच्या प्रियकराशी माझी ओळख करून दिली होती. असे असून देखील हीच बाहेरख्यालीपणा चालूच असायचा दिसायली देखणी असल्याने तिच्या भोवती "रुंजी" घालणारे, अगदी ऑफिसमधील होते. रॉकीबरोबर लग्न ठरलेले असून, ती " दुसऱ्याशी प्रेमसंबंध ठेऊन होती. लवकरच तिचे दुसऱ्या प्रियकराबरोबर फाटल्याचे समजले. काही दिवसातच, तिने ऑफिसमधील, "थिगेसन" बरोबर "सूत" जमविले त्यावेळेस मी तिच्याशी बराचवेळ बोललो परंतु पालथ्या घड्यावर पाणी!! कामात अतिशय हुशार पण, चारित्र्य हे असे!!

तशीच कथा ज्योतीची!! वास्तविक परंपरागत गुजराती कुटुंबातील हि मुलगी इथल्या मुली गप्पा मारणे प्रसंगी ऑफिसमधील सहकाऱ्याबरोबर जेवायला जाणे, यात कुणीही "निषिद्ध" मानत नाही. ज्यीतीच्या घरी तर मी बरेचवेळा गेलो होतो तिच्या घरातल्यांशी माझे फार जवळचे संबंध झाले होते. इथेच मला खऱ्या अर्थाने इथला भारतीय समाज समाज कळला.

ज्यीतीची आई अतिशय देखणी, हसतमुख अशी आहे ड्रायव्हिंग स्कूल त्यांनी काढले होते, त्यामुळे घरात नेहमीच वर्दळ. ज्योतीचे वडील मात्र दिसायला थोडे वयस्कर होते (२००४ साली ते गेले!!) तरीही त्या कुटुंबात माझे खूप चांगले स्वागत व्हायचे, पुढे मी दुसऱ्या शहरात गेलो तरी या कुटुंबाशी संबंध राखून होतो. जसे तिच्या घरी, येणे/जाणे वाढले तशी, घरातील अनेक गोष्टी समजायला लागल्या. घरी, ड्रायव्हिंग शिकायला आलेल्या एका तरुणाशी ज्योतीच्या आईचे संबंध जुळले!! इतके की, तिच्या नवऱ्याला देखील याची कल्पना होती!! पण, जिथे नवराच बाहेर संबंध ठेऊन होता तिथे तो हिला कुठून विरोध करणार!! पुढे, १९९७ मध्ये ज्योतीचे लग्न झाले ( म्हटले तर हि "बातमी"!!) आणि ज्योती डर्बन इथे आली.

पीटरमेरित्झबर्ग पासून डर्बन केवळ ९० किलोमीटर, त्याचसुमारास, मला डर्बन इथे नोकरी मिळाली आणि अधूनमधून ज्यीतीशी गाठभेट व्हायला लागली. हळदीचा रंग चार दिवस, या न्यायाने सुरवातीला ती खूपच आनंदी दिसायची. पुढे काही वर्षांनी मी डर्बन सोडून रस्टनबर्ग इथे गेलो आणि एकेदिवशी, ज्योतीचा मला फोन आला "कालच अभिजितने मला घराबाहेर काढले आणि मी आजपासून माझ्या मावशीकडे, डर्बन इथेच राहायला सुरवात करीत आहे!!" एव्हाना मला इथल्या संस्कृतीची चांगली ओळख झाल्याने मला तसे काही फारसे आश्चर्य वाटले नाही. काही दिवसांनी, माझ्या डर्बन इथल्या मित्रांनी बातमी दिली. लाग्नानंतर काही दिवसातच, ज्योतीचा, तिच्या नवऱ्याच्या मित्राशी संबंध आला आणि इतका आला की गावात बभ्रा व्हायला लागला. या प्रसंगाची परिणीती अशीच होणार होती. वास्तविक. ज्योती माझ्याबरोबर काम करायची तेंव्हा इतकी सालस, सरळ होती ( या शब्दाला आता काहीही अर्थ नाही तरीही!!) की, तिच्याबाबतीत

असे काही घडेल असे मला कधीच वाटले नव्हते. लग्न होऊन चार(च) वर्षे झाली होती आणि तिची अशी चित्तरकथा!! अशा कितीतरी कथा, माझ्या वास्तव्यात बघायला मिळाल्या.

रस्टनबर्ग मधील कंपनीत, माझ्या विभागात "तान्या" नावाची गोरी मुलगी होती. माझ्या आयुष्यात आलेली हि पहिली गोरी मुलगी. वास्तविक डर्बन इथल्या कंपनीत काही गोऱ्या मुलींशी ओळखी झाल्या होत्या पण, त्या मुली दुसऱ्या डिपार्टमेंट मध्ये कामाला असल्याने फक्त जुजबी ओळख होती. हि, जशी कल्पना केली त्याप्रमाणेच निघाली. गोरा समाज मुलतः मोकळा (वागायला नि बोलायला देखील!!) असतो, त्यातून आता इथे तर एकत्र काम करायचे म्हटल्यावर, ओळख चांगली झाली. साउथ आफ्रिकन संस्कृतीप्रमाणे वयाच्या १७ व्या वर्षी एकटे राहायला सुरवात. अर्थात, Boyfriend आवश्यक. इथे वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत जर का Boyfriend/ girlfriend नसला तर त्या मुला/मुलीतच कमतरता आहे, असे मानण्यात येते!! धन्य तो समाज!! थोड्या ओळखीनंतर, समजले कि त्यावेळचा मित्र, हा तिचा तिसरा Boyfriend!! एकेकट्याने आयुष्य, स्वतंत्र काढायचे, तेंव्हा सगळ्या निर्णयांची जबाबदारी घेणे येतेच!! एक गोष्ट मला स्पष्टपणे समजली. गोऱ्या रंगाची माणसे, शक्यतो काहीही लपवून, छपवून करीत नाहीत. वयाच्या ६० व्या वर्षी समजा, आपली आई (एकटी असेल तरच) दुसऱ्या तरुण किंवा वयस्कर पुरुषाच्या प्रेमात पडली तर मुलगा/मुलगीच पुढाकार घेऊन, शक्यतोवर लग्न लावून देतात आणि त्यात काहीही गैर मानत नाहीत. हे कितपत संय्युक्तिक आहे, हा वादाचा मुद्दा (आपल्या दृष्टीने!!) ठरू शकतो, त्यांच्या नाही!! आता एकत्र राहायचे म्हटल्यावर शारीरिक संबंध येणारच आणि तिथे देखील कसलीच लपवाछपवी नाही.

अगदी उघड!! याच कंपनीत टीना नावाची गोरी मुलगी होती.पहिले लग्न मोडलेले तरीही काहीच घडले नाही असे वागणारी!! ती देखील, तिच्या गोऱ्या मित्राच्या घरी राहत होती, मुलासकट!! पुढे काही महिन्यांनी त्यांचे पटेनासे झाले, तिने, त्याचे घर लगेच सोडले आणि स्वतंत्र राहू लागली.अशा घटनांचा त्यांच्या आयुष्यावर दिसण्यासारखा काहीही परिणाम होत नाही. एकट्या असतील तेंव्हा बहुदा अश्रू ढळत असतील, असा देखील अनुभव मला याच मुलीच्या बाबतीत आला. एकदा, एका संध्याकाळी तिने मला जेवायला घरी बोलावले (रविवार दुपार!!) आणि ड्रिंक्स घेताना, तिने माझ्याकडे मन मोकळे केले. गोरी व्यक्ती रडताना, पहिल्यांदाच पाहत होतो. कितीही वाईट वाटले तरी, अखेर मी "परका". काही दिवस(च) इथे राहायला आलेला, तेंव्हा मी तरी काय दिलासा देणार!! पण, असे प्रसंग विरळाच!! अशा अनेक कथा, माझ्या गाठीशी आहेत. खरेतर, माझा, ज्या,ज्या मुलींशी संबंध आला, तिच्यावर प्रत्येकी एक, असे प्रकरण लिहावे लागेल. प्रत्येकीच्या आयुष्यात काहीनाकाहीतरी घडलेले आहे. चांगले/वाईट, दोन्हीही!! इथे मी मुलींचीच उदाहरणे दिली आहेत परंतु पुरुष किती "लंपट" आहेत, याचे तर कितीतरी अफलातून अनुभव आहेत.

अनिल गोविलकर govilkaranil@gmail.com



## प्रवास सुखाचा...... श्रीराम वाघमारे,

---

सुख आणि दु:ख या एकाच नाण्याच्या दोन बाजू. सुखानंतर दु:ख आणि दु:खानंतर सुख असा अविरत प्रवास सुरूच असतो. 'सुख सांगू नये, वाटावे.. दु:ख वाटू नये, सांगावे..' हे किती सुंदर तत्व आहे जीवन जगण्याचे.पण आपण मात्र दु:खाचा उगाचच फार मोठा बाऊ करतो. स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब, लहान-मोठा या सार्‍यांच्या आयुष्यात कधी ना कधी दु:ख डोकावतेच. पण आपण मात्र आपल्याच दु:खाला कवटाळून बसतो. आपल्याच दु:खावर इतरांनी फुंकर घालावी अशी आपली अपेक्षा असते. इतरांचे दु:ख आपण कधीच समजून घेण्याची साधी तसदी देखील घेत नाही. मात्र जो इतरांचे दु:ख समजून घेतो त्यालाच कळते की इतरांपेक्षा आपले दु:ख किती शुल्लक आहे. जगामध्ये आपल्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक दु:ख आहे. इतरांचे दु:ख जाणून घेणे स्वत:साठी देखील असे फायदेशीर ठरते. आपण ज्याचे दु:ख समजून घेतो त्या व्यक्तीचे आपल्याजवळ व्यक्त केल्याने दु:ख निश्चितच हलके होते आणि आपणांस देखील जगात आपल्यापेक्षा अधिक दु:खी-कष्टी जीव आहेत याची जाणीव होऊन इतरांच्या तुलनेत आपले दु:ख काहीच नाही असे वाटून निश्चितच हायसे वाटते.

बर्‍याचदा अपयश हेच दु:खाचे एकमेव कारण असते. पण अपयश ही तर यशाची पहिली पायरी आहे. कधी-कधी यश हे अगदी सहज मिळून जातं.. फारसं काहीही न करता आणि कधी-कधी खूप प्रयत्न करून देखील अपयश पदरी पडतं. यशस्वी होण्यासाठी तुमची इच्छाशक्ती सर्वात महत्वाची असते. सर्वांमध्येच कमी-जास्त प्रमाणात गुणवत्ता ही असतेच. यश मिळवण्यासाठी जो तो आपापल्या परीने परिश्रम हे घेत असतोच. मात्र यश सर्वांनाच मिळतं असं नाही. मग आपण यशाचा संबंध नशिबाशी जोडतो. पण यश हे कधीच नशिबावर अवलंबून नसते. नशिबात असेल तर यश मिळणार, नसेल तर नाही हा दृष्टीकोन नक्कीच चुकीचा आहे. केवळ इच्छाशक्तीच्या बळावर अवघडात अवघड ध्येय गाठता येऊ शकते. फक्त त्याकरिता प्रयत्नात

सातत्य राखणे आवश्यक आहे. पहिल्या प्रयत्नात यश नाही मिळाले तर नैराश्य न येऊ देता पुन्हा-पुन्हा प्रयत्न करणे महत्वाचे आहे. अपयशाने खचून जाऊ नये आणि मिळणाऱ्या यशाने हुरळून जाऊ नये. अयशस्वी झालेल्या व्यक्तींनी हे लक्षात घेतले पाहिजे कि एक मार्ग बंद झाला तर इतर अनेक मार्ग खुले झालेले असतात. आणि जे यशस्वी झाले आहेत त्यांनी यश मिळवण्यापेक्षा ते टिकवणे देखील तितकेच महत्वाचे आणि कठीण आहे हे समजून घेतले पाहिजे. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर नैराश्य हे येत असतं. आनंदाप्रमाणेच नैराश्य हा ही जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. नैराश्य आल्यावर त्यातून मार्ग काढून पुढचा प्रवास करणं आवश्यक असतं. नैराश्यावर मात करण्यासाठी अनेक गोष्टींचा आधार घेता येऊ शकतो. योग तसेच ध्यान करणे, निसर्गाच्या सानिध्यात रमणे, प्रियजनांची तसेच आप्तजनांची भेट, त्यांचेशी चर्चा, सल्ला-मसलत, आपल्या छंदांमध्ये मन रमविणे इत्यादी. मला नैराश्य येतं तेव्हा मी माझ्या जवळच्या मित्रांना आवर्जून भेटतो. त्यांचेकडून एक नवं बळ, ऊर्जा नेहमीच मिळते. तसेच काही प्रेरणादायी गीतं मी ऐकतो. आणि मग आलेल्या परिस्तिथीला सामोरे जातो. आणि त्या नंतर तीच समस्या अगदी शुल्लक वाटायला लागते.

शेवटी आनंद म्हणजे मनाचे समाधान. समाधान हे भौतिक गोष्टींनी मिळत नाही. समाधान हे नेहमी मानण्यावर असते. वरवर आनंदी दिसणारा चेहरा समाधानी असेलच असे नाही. तेव्हा जीवनातील दु:खालाही धैर्याने सामोरे जा.. मिळालेले अपयश स्वीकारायला आणि पचवायला शिका.. आणि आलेले नैराश्य झटकून टाका. नक्कीच तुम्ही समाधानी आणि पर्यायाने आनंदी व्हाल.

श्रीराम वाघमारे, नाशिक

shriram25@yahoo.com

~~0~~

## महा देवींची पूजा-एक नवीन विचार .... मोहना कारखानीस

==========================================================

शारदीय नवरात्रीत भक्ती रसाने सर्व आसमंत भरून जातो.. वातावरणात सगळीकडे एक वेगळाच आनंद आणि स्फूर्ती व्यापून उरते.. हे नऊ दिवस घरोघरी देवी मातेची स्थापना होते. महालक्ष्मी देवी अनेक रूपात पूजिली जाते.भक्तीने आणि आदराने लहान- थोर, तरुण-वृद्ध , स्त्रिया पुरुष ह्या देवीची मनोभावे पूजा करतात. ईश्वराला माता मानणे हे भक्तीचे अत्युच्च लक्षण समजले जाते. आपल्या हिंदू धर्मात देवांच्या बरोबरीने देवीला माता समजून पूजले जाते.

असो, ह्या सणांच्या आगमनाने काही दिवसापूर्वी समाजात घडलेल्या घृणास्पद गोष्टीनी समाजाला आणि आपल्या मनाला जी मरगळ आली होती ,ती नवरात्री सारख्या सणांनी काही अंशी दूर होते.. अनेक सोसायटी मध्ये सकाळी देवीची यथासांग पूजा केली जाते. सुरेल आवाजात आरत्या म्हटल्या जातात. नंतर संध्याकाळी अनेक रंगी कपडे घालून स्त्री, पुरुष, मुले नटून थटून दांडिया-गरबा खेळायला जमतात. लोकांचा उत्साह त्यांच्या चेहऱ्यावरून, हावभावा वरून प्रतीत होत असतो. खरे तर दिवसभर काम करून थकून आलेले लोक पुन्हा एकदा उत्साहाने ह्या उत्सवात सामील होताना बघून कौतुक करावेसे वाटते.

नवरात्रीचे नऊ दिवस चालणारे पूजन पाहून माझ्या मनात मात्र नेहमीच एक वेगळी कल्पना नेहमीच आकार घेत असते.नऊ दिवस -नऊ देवीची रूपे. कोणी देवळात जाऊन मातेची मनोभावे पूजा करतो. कोणी घरीच माता अंबेच्या तस्विरीची पूजा करतो.पूजेच्या तर्हा निराळ्या पण मनातील भाव तोच. प्रत्यक्षात मात्र आपल्या आजूबाजूला नजर टाकली तर हेच भक्त आपल्या समाजातील स्त्रीला एव्हढा सन्मान देतात का हा प्रश्न माझ्या मनात उपस्थित होतो. घरातील आणि समाजातील स्त्री आज इतक्या सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगताना तिला अनेक वेळा झगडावे लागते.

खरे सांगायचे तर स्वर्ग लोकीच्या ह्या नउ देवता आपल्यातच वावरत असतात असे मला वाटले .

आपली जन्मदात्री आई , जी वात्सल्याने , प्रेमाने आपल्या हाडा रक्त मासापासून आपल्याला जन्म देते. तिचा अंश घेऊन आपण आपले आयुष्य सुरु करतो. म्हणूनच सर्वात प्रथम मी ह्या महादेवीला नमस्कार करते.आपली आई हीच प्रत्यक्ष जगदंबा आहे असे मला वाटते.

दुसरी माता, देवी म्हणजे आपली आजी. मग ती आईची आई असो किवा बाबाची. ही आपल्या वृद्धत्वाची, थकलेल्या गात्रांची पर्वा न करता आपल्याला दुपल्या खुपल्यात आपल्याला पोटाशी धरते. रात्रभर उशाशी बसून तापलेल्या डोक्यावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवून आपल्या थकलेल्या परंतु प्रेमळ डोळ्याची निरांजने सतत आपल्यासाठी तेवत ठेवणारी दुसरी कोण असते? आपली आजीच न? कधी आई रागावली की आपली बाजू घेऊन आईला रागे भरणारी आज आठवून बघा. ती तर रेणुका आईचे दुसरे रूपच असते.

देवीचे तिसरे रूप , म्हणजे आपली मावशी . माय मरो आणि मावशी जगो अशी म्हण म्हणूनच अस्तित्वात आली असावी.मावशी आपली सखी असते,आपल्या बरोबर अडी अडचणीला तीच ठाम उभी असते.लहानपणी आणि नंतर कुमार वयात आपली गुपिते तीच शेयर करते. मनाचा कंटाळा चुटकी सारखे घालवण्याचे काम तीच करते. म्हणूनच मला नेहमीच माझ्या मावशीला दुर्गा मावशी म्हणावेसे वाटते.

माझ्या सासूत मला देवीचे चौथे रूप दिसते. माझ्या आयुष्यात आलेल्या माझ्या जोडीदाराला जन्म देणारी, लग्न झाल्या पासून माझ्या सुख दुखात नेहमीच सामील झालेली माझी सासू प्रत्यक्ष पार्वतीचे रूपच आहे असा मला भास होतो. पार्वतीने सुख दुखात सतत आपल्या पतीची साथ दिली. थंडी ,वारा, सुख सोयी ,धन दौलत कश्याचीच पर्वा न करता महादेवाची साथ पार्वतीने रात्रंदिन दिली. आपण पार्वतीची पूजा करतो म्हणजे काय करतो? पार्वती सारखेच पतीसेवेचे व्रत मनापासून घट्ट देण्यासाठी तिची प्रार्थना

करतो. आपल्या सासू पासून घर-कुटुंब सांभाळण्याची प्रेरणा आपल्याला सतत मिळत राहते.

माझ्या मुलीत मला देवीचे पाचवे रूप दिसते.आपल्या मुलीत आपल्याला समर्पणाची आणि प्रेमाची भावना ओतप्रोत भरलेली दिसते. तिच्यात कुटुंबाची काळजी आणि सर्वांना सांभाळून घेण्याची भावना उपजतच असते. म्हणूनच तर लग्न झाल्यावरही ती सासू सासर्यांबरोबर आपल्या आई वडिलांचीही तेव्हढीच मायेने काळजी घेते. मुलीची कपड्या लत्त्याची ,थोडी नटण्या मेद्ण्याची हौस आपल्या जीवनात एक वेगळाच उत्साह आणि आनंद घेऊन येते. आजच्या समाजात शिकलेली, स्वावलबी मुलगी अख्या कुटुंबाला सावरून घेते. म्हणूनच मला माझ्या मुलीत देवी सरस्वती आणि लक्ष्मी ह्या दोघींचे रूप दिसते.

सहावे देवीचे रूप मला माझ्या मैत्रीणीत दिसते. बालपणापासून ते आजपर्यंत माझ्या जीवाला जीव देण्यारा अनेक मैत्रिणी भेटल्या. मैत्र हेच एक दैविक अंश बाळगून असते. अनेक नात्याहून आगळे वेगळे असे हे नाते. ह्या नात्याला अनेक पदर असतात. ह्या नात्यात मान- अपमान, गरीब- श्रीमंत असा भेद भाव नसतो. त्यामुळेच हे नाते देवघरातील तेवणार्या निरांजनासारखे मंद तेवत राहते. बाहेरील वादळे खऱ्या मैत्रीला कधी तोडू शकत नाही. माझ्या मैत्रीणीत मला देवी गौरीचे रूप आढळते.

माझी नणंद -माझ्या नवर्याची बहिण ही लग्न झाल्यापासून माझी सखी, बहिण आणि सहकारी बनून राहिली आणि मला तिच्यात देखील देवीचा एक अंश असल्याचा भास झाला. आह ,नुसता भास नाही तर थोड्याच दिवसात ह्या गोष्टीवर माझा विश्वास बसला.

देवीचे आठवे रूप मला माझ्या बहिणीत पाहायला मिळते. बहिणीची माया भाऊ देऊ शकत नाही. बहिण कधी भांडेल ,कधी आप्ल्यात वाद विवाद होतील. . पण ही भांडणे म्हणजे आळवा वरचे पाणी. ते कधी जास्त वेळ टिकत नाही. आपल्या सुख दुखात भागीदार होणारी ही आपली बहिण आपल्या वर जीवा पाड प्रेम करते. कधी चुकलो तर स्पष्टपणे आपल्या चुका

दाखवून देते. तशा आपल्या चुका दाखवून देणारी आणि आपले मनापासून हित चिंतणारी म्हणजे आपली बहिण. हीला तर मी शांता दुर्गा म्हणते. कधी नदीसारखी शांत तर कधी चंडिके सारखी उग्र. पण दोन्ही रूपडी हवीहवीशी वाटणारी.

आणि नववे रूप मी माझ्यातच शोधते. मी माझ्या घराची स्वामिनी. माझ्या पतीची अर्धांगिनी. माझ्या मुलीची आई , माता. मायेची आणि वात्सल्याची पखरण करून सगळ्या कुटुंबाची मी काळजी घेते. मग माझे स्वत्व , माझे शारीरिक आणि मानसिक आरोग्य मी जपले नाही, पुजिले नाही तर माझ्या बरोबर आख्खे कुटुंबच पंगु होईल.पर्यायाने समाज ही अधू आणि किडका होऊन जाईल. हा विचार मनात घेऊन मी माझा आत्मविश्वास कधी ढळू न देता माझ्या कामावर आणि विचारावर आढळ विश्वास ठेवून पुढे चालत राहते.

पूजेचा खरा अर्थ वात्सल्याने जपणे. काळजी घेणे.मी ह्या सगळ्या देवीना मनापासून नमस्कार करते आणि समाजालाही विनंती करते ह्या सगळ्या देवता तुमच्या आमच्या बरोबर वावरत आहेत . त्यांना प्रसन्न करण्यासाठी फार दूर दूर कशाला देवळे धुंडाळता ? आपल्या मनाची कवाडे सताड उघडा आणि स्वच्छ नितळ नजरेने आपल्या ह्या सख्यांना, एकदा बघा. मग बघा होतोय न साक्षात्कार ? ह्या देवीना प्रसन्न करण्या साठी उपास तपास करायची गरज नाही. एक प्रेमाची हाक आणि मायेचा आधार पुरेसा आहे. मग बघा आपल्या घरात कशी प्रसन्न सोनेरी सकाळ उमलते ते!

मोहना कारखानीस
mohanakarkhanis@gmail.com

**~~~0~~~**


# *राजस्थानी चित्रकलेचा खजिना ' बुंदी ' .... माधव विद्वांस*

दूरदर्शनवर मध्यंतरी भारतातील दुर्ग मालिकेत कोटा शहराजवळील ' बुंदी ' किल्याचे दूरदर्शन झाले होते

तेव्हापासून किल्याचे दर्शनाची ओढ होती. व इच्छा पूर्तिचा योग डिसेंबर 2005 मधे आला. राजस्थान सहलीमधे बुंदी आवर्जुन घेतले. सहलीच्या अखेरच्या टप्प्यात बुंदी होते. जयसलमेर – बिकानेर – उदेपूर – जयपूरचे पॅलेस पाहून सहप्रवासी कंटाळलेले वाटले. इथे वेगळे काय असणार ? असे प्रश्न बुंदी रद्द करा असे सुचवु लागले येथे तुम्हास आल्याचा नक्कीच आनंद होईल. '' नयाल तर फसाल' याल तर खुश व्हाल '' असे सर्वांना सांगत पहाटे 5.30 वाजता कोटयास पोचलो. रेल्वेस्थानकातील डॉरमेटरी घेऊन सर्वजण फ्रेश झाालो. गरम पाणी मुबलक त्यामुळे यथेच्छ उणोदक स्नान गुलाबी थंडीत फारच सुखावह झाले.मी व सुहास बस स्टॉपवर आलो व बुंदीला जाणा–या गाडीची चवकशी करु लागलो. तेवढयात 'बुंदी–बुंदी'अशीाअर जीपवाल्याची आरोळी ऐकू आली. व एकदम बुंदी ऐवजी मोतीचूर खाल्ल्याचा आनंद झाला.

कोटा बुदी कोटा असा परतीचा प्रवास ठरवून 40 कि.मी अंतरावरील बुंदीकडे प्रस्थान ठेवले. ' दुरुन डोंगर साजरे ' अशी म्हण आहे. परंतु बुंदी जवळ गेल्याशिवाय मात्र त्याचे साजिरे रुप दिसत नाही.

अरुंद गल्ली बोळातुन कशीबशी एकदाची जीप किल्ल्याचेप्रवेश द्वाराशी आली. ब्रिटीश प्रवासी रुपयार्ड किपलिंग याने''मनु याची स्वप्न दृ टी' असे या




किल्याचे वर्णन केले आहे.बुंदी येथील महाल व वरचेबाजूस असलेला तारागड

13 व्या    शतकातील आहे.समोरच्या महालाची उंची कॅमेरामधे येण्यासाठी मागेमागे

सरकत अश्वशाळेपर्यंत गेलो पडक्या भिंतीस टेकताच कोणीतरी रेकल्याचा आवाज आला मागे पाहीले तर वराह कळप होता. पुढेपरत महालाचा गवाक्षावर लक्ष केंद्रीत केले. तर काही विदेशी दुर्बिणितून परिसर पहात होते. पुढे विदेशी मागे वराह. कॅमरा क्लिककेला व पुढे चालू लागलो.हातीपोला मधून राजवाडयात प्रवेश केला महालाचा प्रवेश द्वारावर मोठी हत्तीशिल्पे दोन्ही बाजूस असून मधेसोंडेची कमान केलेली आहे. हि शिल्पे वरच्या बाजूस आहेत. आतील बाजूस दरबार चौक आहे. दरवाजाचे आतील बाजूही सुंदर आहे. एकामागून एकमजले दालने पार करीत बादल महालाजवळ आलो. एका दालनात सुंदर चित्रेआहेत.तसेच एक आरसे महालही आहे. त्याची आवस्था वाईट आहे.परंतु पुर्वीचे सुस्थितीतील त्याचे सौंदर्य नजरे पुढे तरळून जाते.

एका महालात प्रत्येक खांबावर तुळवंटी खाली चारहत्ती खुबीने बसविलेलेही आहेत.जणु कांही तुळवंटीस आधार दिल्यासारखे दाखविले आहे. राजकन्येसाठी झोका घेण्याची तसेच मैत्रीणिसाठी खेळण्याची जागा सर्वच ठिकाणी कल्पकता आहे. एका ठिकाणासाठी सतिजाणा—या स्त्रियांचे पंजे उठविलेले आहेत. त्यावेळचा प्रसंगाचाकल्पनेने अंगावर    शहारा आला.बादल महालातील सर्वात उंच छज्यामधून नवलसागर तलाव मधोमध असणारी छत्री समोरचे डोंगरातील हमरस्ता व बुंदी गावचे ‘ विहंगम ’ दृश्य दिसते.बुंदीचे खरे सौदर्य आहे “ रंगविलास ”; म्हणजेच चित्रशाळा. बादल महालाचे मागील बाजूस वरच्या बाजूसचित्रशाळा आहे. येथे सुंदर छोटा बगीचा आहे. लॉन आहे. मधोमध छोटा हौद व बाजूस आर्ट गॅलरी आहे. चित्रामधे **कृष्ण** रामचरित्र तसेच इतर पौराणीक देखावे चित्रीत केले आहेत.हत्तीची झुंज त्यावेळच्या राजांचे दरबार चित्रित केले आहेत. **कृष्णा**चे रास क्रिडेचेही सुंदर चित्र आहे.

बुंदीजवळच छत्रसालाच्या 64 राण्या सतीगेल्या होत्या त्यांच्या छत्रया क्षरबागेत आहेत. जैतसागर — फूलसागर 8 कि.मी. अंतरावर आहेत. रंगविलासाचे उत्तरेकडील तारागड राजा नरसिंहाने 1354 मध्ये बांधला. तारागडवर खास

बघण्यासारखे नाही. बुंदी गावात राणी बावडी, सूरज छत्री या राणी शामसुंदरीने तर मोरडी छत्री छत्रसालाची ‘‘सहपत्नी’’ मयुरीने बांधली. गावाबाहेर 84 खांबअसलेले महादेव मंदिर आहे. याला 84 खांबी छत्री असेही म्हणतात येथून कोटयाकडे रस्ता जातो. दुपारी कोटा येथे आलो. कोटयाजवळ चंबळ बरेज व कोटा फरशीच्या खाणी आहेत. कॉटन मार्केट म्युझियम आहे. जवळपास सहलीची ठिकाणेही आहेत. तर चला कोटा बुंदीचे मोतीचूर पहायला.

माधव विद्वांस

**vidwansmadhav91@gmail.com**

~~~~~~
~~~~~~

# अष्टाक्षरी

# गझल

# अष्टाक्षरी साबिरांची

येथे नाही, तेथे नाही....
अशी भेट कुठे नाही!
वीज धरेला मिळाली;
अशी प्रीत कुठे नाही!!

येथे नाही, तेथे नाही....
अशी तृष्णा कोठे नाही!
नदी, सागर तुडुंब....
पण तृष्णा जात नाही!!

येथे नाही, तेथे नाही....
अशी आस कोठे नाही!
ओढ चंद्राची नभाला....
त्याला करमत नाही!!

येथे नाही, तेथे नाही....
असे उदास ना कोणी!
चांदण्यात जळतो मी....
तसे पोळले ना कोणी!!

येथे नाही, तेथे नाही....
असा प्रहर ना कोठे!
कण कण तेजाळला.....
असा बहर ना कोठे!!

येथे नाही, तेथे नाही....
माझा प्रश्न निरुत्तर!
देव हृदयात माझ्या.....
तरी सरेना अंतर!!

येथे नाही, तेथे नाही....
असा जप निरंतर!
स्पंदनात माझ्या चाले......
माझ्या विठूचा गजर!!

येथे नाही, तेथे नाही....
मन कोठे स्थिर नाही!
मनासारखे कुठेही.....
फूलपाखरूच नाही!

येथे नाही, तेथे नाही....
कुठे स्मृतींचा निवास?
तळघरात मनाच्या;
कोंदे स्मृतींचा सुवास!

येथे नाही, तेथे नाही....
मग आहेस तू कोठे?
ठायी ठायी तू तरीही.....
तुला पाहिलेच कोठे?

येथे नाही, तेथे नाही....
नाही कुठे सभोवती!



बदीऊज्जमा बिराजदार
(साबिर शोलापुरी)
sabirsolapuri@gmail.co

तरही गझल

बेरकी खुलाशांनी, बेगडी दिलाशांनी ।
दुर्दशा तुझी केली, राजरोस चोरांनी ।
.
कालच्या ऋतूने त्या, चोरले हृदय माझे ;
घेतले लपेटूनी, गार-गार वाऱ्यांनी ।
.
चिंब-चिंब दोघेही, चंद्र चांदरातीचा;
मुद्दलीस तू माझ्या, फेडलेस व्याजांनी !
.
न्यायदान ही खोटे, सत्य संपले जेथे,
जायचे कुठे आता, पांगळ्या विचारांनी !
.
जाळले स्वतःलाही, मंद मंद ज्योतींनी ;
जन्म मृत्युचे फेरे, वेचलेत ज्वालांनी !
.
जिंदगीस जगताना, बेरजा वजा केल्या,
आज मी सुखी आहे, कालच्या हिशोबांनी !
.
खूप लोक जमले हे, आज अंतयात्रेला,
सोहळे यशाचे त्या, पाहिलेत डोळ्यांनी !
.
कापला गळा ज्यांनी, पण तरी लळा त्यांचा!
गोडवा तरी होता, बोललो न शब्दांनी !!
.
चालताच येईना, आजही चिरेबंदी,
टाळले मला आहे, दुश्मनीत असांनी !
.
सूर्य चंद्र ताऱ्यांनी, व्यापले नभाला या ;
जोडलीत ही नाती, आज एकमेकांनी !
.
घोट एक दुःखाचा, मी कधी रिचवला ना ;
तो असे म्हणाला पण, का असे इशाऱ्यांनी !
.
पाहशील नेत्यांना, घोष गजर करताना,
फसवले गरीबांना, या अश्या लुटेऱ्यांनी।
.
गझल ही कशी झाली, बोल ना जरा 'साबिर',
एक एक शब्दाला, तोलले हजारांनी।

बदीऊज्जमा बिराजदार
(साबिर शोलापुरी)



## गज़ल...!

घेतलेले श्वास मी, तूफ़ान व्हावे....!
अऩ मरे पर्यंत ते आव्हान व्हावे....!!१!!

एकही घटना अशी घडलीच नाही..?
‘जीव ओवाळून मी बेभान व्हावे...?..!!२!!

माणसांनी माणसांना जाळतांना;-
रंग-बेरंगी छुपे, शैतान व्हावे...?...!!३!!

लागता मागे मरण या जीवनाच्या,-
पारध्याचे का असे अवसान व्हावे...?..!!४!!

बे,हिशोबी पाप माझे ज्ञात ,‘देवा’
माझिया साठी परी वरदान व्हावे....!...!!५!!

ज़हीर कलाम १२/९/१३...छंद;- मंजुघोषा...



## गझल

## वृत्त: मेनका

## लगावली: गालगागा/गालगागा/गालगा

**************************************************

मी जगाची आसवे सांभाळतो!
मात्र माझ्या आसवांना टाळतो!!

सांत्वने केवीलवाणी वाटती.....
जो मला बघतो तसा ओशाळतो!

दु:खही माझे संमजस लाघवी!
त्यामुळे मी वेदना कुरवाळतो!!

ते तुझे मी शब्द ह्रदयी गोंदले.....
तेच मी अद्याप सुद्धा पाळतो!

सोसणे सुद्धा कला आहे, अरे!
दु:ख देणाराच मग कंटाळतो!!



-------प्रा.सतीश देवपूरकर
भूशास्त्र व खानिज तेल तंत्रज्ञान विभाग,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.
फोन नंबर: ९८२२७८४९६१

# गजल

तुझा गंध आला ,कसे आवरू मी ?
खुळ्या या मनाला कसे सावरू मी ?

तुझा भास झाला नदीच्या किणारी
तुझ्या सावलीला कसे पांघरू मी ?

तुझे स्वप्न आले सकाळी सकाळी
तुझ्या आठवांने कसे बावरू मी ?

तुझा स्पर्ष होता कळ्या लाजलेल्या
तुझ्या पापनीला कसे पाझरू मी ?

तुला पाहताना मला मी विसरलो
तुझ्या सोबतीने कसे वावरू मी
कविकुमार -



# कविता विश्व



परवा परवा रस्त्याने जाताना

कचराकुंडी भराभूरून वाहत असलेली

अन त्यात एक भंगार वाली

त्यातले भंगार आपल्या पिशवीतगोळा करत ,

सोबत एक २ वर्षाचे मुल आणि पाळलेले कुत्रे

दोघे हि क्षीण तिच्या सारखेच

आशाळभूत नजरेने एकमेकाकडे पाहत

आपापल्या रात्रीच्या जेवणाची काळजी करत.



बाजूलाच कसायाच्या दारासमोर झाडाला ,

२ /४ शेळ्या बांधलेल्या आपल्या समोर टाकलेल्या

हिरव्यागार चार्या ला मनसोक्त खात

,थोड्याच वेळाने जरी त्यांच्या गळ्यावरून

सुरा फिरणार असला तरी निर्धास्त रोजच्या प्रमाणे शांत .

समोरच एक दुकानदार आपल्या हॉटेलची सुरवात करताना

पहिला चहा आणि पदार्थ रस्त्यावर समर्पित करतो

( बहुतेक वास्तुपूजा )आणि अगरबत्ती लाऊन सुरवात करतो

आपला धंदा रोजच्या प्रमाणे

मी त्या सगळ्यांना आळीपाळीने पाहत आपल्या विचारात .

................................................ .......................................

भंगार वाली च्या चेहऱ्यावर थोड्या फार ,

दिवसभराच्या कमाई चा ,

तिचा आनंद तिने आपल्या आशाळभूत पोरांना दिलेला .

कासायाय्च्या दुकानाच्या मोरीत तोपर्यंत रक्ताचा पाट वाहिलेल्या ,

त्यालापण एक आनंद वेगळा आज बर्यापाकी गल्ला दिसल्याचे

दुकानदाराच्या दारा समोरील टाकलेला पदार्थ उन्हाने सुकलेला

आणि सुकलेल्या त्या चारी डोळ्यांनी

(तो डोळ्यात भरून ठेवलेला दिवसभरासाठी )

तेवढ्यात माझ्या मनाला ठेच लागते

आणि क्षणात मी भानावरसर्व आपापल्या मार्गावर.

माझ्याप्रमाणेच रोज पुन्हा नव्याने



विनय

**vinay gado**

gadovinay667@gmail.com

**~~~o~~**

- रुद्रप्रयाग



कसा कोपला केदारा ,डोळा उघडी तिसरा ,
बंद डोळ्याखाली तुझ्या ,रडे मुलुख हसरा.
हिमालयाच्या हृदयी गेले जलाशया तडे
झाला प्रलय असाकी तुझी भक्ती त्यात बुडे
पडे डोंगर खालती,माजे दगडाचे रान
खरेच का आहेस तू?ठेचाळले माझे मन.
वेगवान पाण्यामध्ये सारे शहर वहाते,
तारणार तूच हीच आशा कुठे न रहाते .
किती निरागस जीव ,जाती काळाच्याच पाशी
दयावंत जगन्नाथा ,आली तुला का उदासी?
कसे केलेस उजाड ,रेखी विनाशाची नक्षी,
पिंडी तुझी चिरेबंद राही साऱ्यालाच साक्षी!

सौं माधुरी काजवे .

## भारत निर्माण !!

सद्य परिस्थितीवर नुसत्या चर्चा केवळ 'टाईमपास' आहे
नेहमीच्याच बातम्या पुन्हा पुन्हा वाचण्याचा 'खुळा-नाद' आहे !

भूकबळी काय थांबविणार ? ते स्वत:च उपाशी आहे
इतकी वर्षे खाऊनही अजून खाण्याचा अट्टहास आहे !

सामान्यांस कोण रक्षणार ? त्यांनाच मरणाचे भय आहे
आंधळा न्याय, मुका राजा, बहिरे सरकार आहे !

देवांनाच लाज वाटते, असा संधी"साधू"चा प्रताप आहे
पाय लटपटती पण एकांती रासक्रीडेचा प्रकार आहे !

रुपयाचे अवमूल्यन कसे रोखणार ? सारे निराधार आहे
अमेरिकन अर्थव्यवस्थेवर अवलंबून ह्यांचा सारा कारोबार आहे !!

जोतो उद्याच्या काळजीने त्रस्त, महागाईने गांजलेला आहे
दररोज बलात्कार खून, असा "भारत निर्माण" झाला आहे !!

-- संजय कुलकर्णी.

# किमया शरदाची

निशिगंध पसरला
मुग्ध शरदाचे चांदणे
उतरता अवनीवर
हर्षे सौंदर्याचे लेणे

कशी किमया मग झाली
सोने हळूच पसरले
प्रियकराच्या उबेला
प्रिया मन आसुसले

नाही कसले बहाणे
नाही तसले उखाणे
लज्जा लाजत प्रियेची
कुशीमध्ये विसावणे

थंड वार्याची झुळूक
गात्र गात्र थरारती
तरी प्रिया का रुसली
मग प्रिया का हसली

काय करावे सुचेना
प्रियकर झाला खुळा
शारदाचा येता झोका
झाला आणिक बावळा

मानू आभार कुणाचे
शारदीय चांदण्याचे
थंडगार त्या हवेचे
उबदार कि प्रियेचे

राधा एकरूप झाली
कृष्ण सावळा दिसेना
शरदाच्या चांदण्यात
गौर वर्णही हरवला

पावा कुणासाठी होता
कण कण झंकारता
राधा मनी कृष्ण कृष्ण
कृष्ण मनी राधा राधा

प्रिन. राम म्हात्रे



## ➡ओ बापू

परवा बशेल हुतो एकलाच वावरात,
ढ्यकळं होती संग बोलाया,
त्यवढ्यात बापु दिसलं माला....
बापु वं...आपलं म्हात्मा बापु...

म्या म्हणलं आयला...
देवंच जणु गरीबाला पावला....
ते हासलं वाईच्च...आन बसलं ढ्यकळात..
माला इचारलं बापुनी
"कोण रं बा तु.....?
म्या म्हणलं "मी श्यतकरी....हीहीही
मंजी कुणबी...मंजी येडाआ....हीहीही...कायबी म्हणा"....

तमाखु काढली हातावं
लाजलो जरासा...... आन फ़ेकुन देली
म्या म्हनलं तुमी त्यच ना
जैनी ते मीठ आणलं हुतं....?
ते म्हणलं.."व्हय रं बाबा तो मीच"
म्या हळुच घड्येळ चाफ़डलं कमरंचं..
हीहीई...चालु हाय का बंद हाय.... ते गप्प रायलं..

म्या तेनला घराकं निलं
ते म्हणलं बाबा सोतंत्र हायेस आता,
म्या म्हणलं....व्हय बापु...पर विंग्रज नाहीती फ़कस्त
बाकि समदं तसंच हाय बापु"
ते घरात आलं वाकुन
गादीवं बशिवलं फ़ाटक्या...बेंडकुळं होती कापसाची

बापु म्हणलं का रं बाबा
लईच कष्टात दिसतुस तु
म्या म्हणलं "बापु तुमी कावं गेला..
आवं तुमच्या लोकायनी
आख्खा मावा फ़स्त केला...."
बापु चाहा पेत व्हते...श्यळीच्या दुधाचा




तेनला आमची घरवाली बोलली
बापु! म्हाराष्ट्र मंजी कंचा असतो ओ...?
बापुनं डॊळं पुसलं सोग्यानं
"आगं ताई व्हता तो कव्हातरी.."
आता खाल्ल्या ढोरायनी....."
पर तुमी धाबरु नगा
राम यील...परभुराम यील
त्यो करील सम्दं नीट.."

उठलं बापु गादीवरुन....फ़ाटक हुगडंच
यतो रं मी दादा....काळजी घ्ये
चष्मा हुता तरी पाणी पाह्यला म्या तेंच्या डोळ्यात
कडाकडानं निंगुन गेलं बापु
त्यच बापु जैनी देस वाचिवला......
त्यच बापु जैनी माणुस वाचिवला

संतोष वाटपाडे

~~~0~~
~~~

- तळहात

माझ्या तळहातावर तुझा तळहात ठेव
रिक्त मनाच्या गाभाऱ्यात
तेवणारी ज्योत ठेव
काजव्याइतका जरी चमकलास
तरी चांदण्यारात्रीची साथ ठेव
माझ्या तळहातावर तुझा तळहात ठेव ... !!!

झ-यासारखा प्रवाहित होशील तेव्हा
माझेच प्रतिबिंब दिसेल तुला त्यात
बिलोरी त्या आरश्याला
चमचमणारा काठ ठेव
माझ्या तळहातावर तुझा तळहात ठेव .... !!

उमलेल जेव्हा पारिजात
उमलेल सुगंधी रातराणी
हळव्या ओल्या पाकळ्यावरती
नाजूक तुझे ओठ ठेव
माझ्या तळहातावर तुझा तळहात ठेव ... !!



ग्रीष्माच्या जेव्हा खाणाखुणा
वसंत मागे सोडून जाईल
गुलमोहराच्या झाडाखाली
फुलराणीची भेट ठेव

माझ्या तळहातावर तुझा तळहात ठेव... !!
...... ...तारा ठाकरे

## पुरेपूर कोल्हापूर

करवीर म्हणजे जणू
वीरांची आहे भूमी
उसळत्या रक्ताला इथल्या
कसलीच नाही कमी

तालिमीसाठी प्रसिद्ध शहर
भीमासारखे मल्ल देई
रांगड्या छातीत ह्यांच्या
मृदुताही निपजली जाई

महालक्ष्मी हे शक्तीपीठ
उभे तयांच्या पाठीशी
जोतीबाचीही जोड गड्या
सिंचते भक्तीच्या राशी

उभा ठाकला पन्हाळा
लेऊन शौर्याची झळाळी
तबक उद्यानाच्या साथीने
निसर्गानेही कलाकुसर केली

सिद्धगिरीच्या गुंफा म्हणजे
प्राचीन जीवनाचा सुरेख मेळ
कोल्हापूरकरांच्या सानिध्यात
उल्हसित बनतो सगळा वेळ

-- मयुरी कदम
mayuri1509@gmail.com

## विराम

दोस्ती मैत्री म्हणजे
होती ज्यांची जान
आज तेच उभे ठाकले
देऊन एक पूर्णविराम
यारी तुमची लाख मोलाची
रत्नेही इथे फिकी पडायची
कसा सुटला मग तो हात
का वाटते हि अधुरी वाट
तुझं माझं असं कधीच नसायचं
सगळं शेवटी 'आपलंच' व्हायचं
तुम्हाविना न सुचायचे काही
आज का मग नजर रितीच राही
तुम्हापाशी गवसला तो सूर
त्यापायी जगणे झाले सुंदर
आज कुठे हरवला तो षड्ज
का व्हावे नीरस सारे जग
पुन्हा एकदा हवाय तो उल्हास
ती वृत्ती आणि मने दिलखुलास
चला मिटवून टाकू हा विराम
जोडूनी पुढे . . . अर्धविराम

--- मयुरी कदम
०८/०९/२०१२

**माझा देव बाप्पा**

माझा देव बाप्पा
आज झाला अबोल
भाविकांची मुस्कटदाबी पाहून
गप्प झाला बसला रुसून ......

भोळ्या भक्ताना
देई गोड आशीर्वाद
पण बडव्यांच्या कार्यापुढे
आज पुरता गेलाय गडबडून .......

रात्रंदिन लाविती रांगा
तरीही कुरबुर नसे आम्हा
बाप्पाच्या दर्शना वेडे असू
दर्शन होता तुझे नाचतो आनंदून
.......

सेलीब्रेटिंच्या गर्दीत राजा
एव्हाना गुदमरून गेलाय
खऱ्या भक्तांसाठी मात्र
बाप्पा मंडपात राहिला बसून .......

कुणावर रोष नाही देवा
तुझी कृपा ठेव सर्वांवरी
फक्त सुबुद्धी देवून काहींना
सेवा आमची नम्रतेची घे तू मानून

**नटखट रे तू नंदलाला**

नटखट रे तू नंदलाला

तरीही तुझा आहे बोलबाला !!

माखन चोर लडीवाळा
तरीही राधेचा तूच दिलवाला !!

चाळे करीशी हजारवेळा
गोंडस लाडका तू गोकुळवाला !!

लळा लावूनी गवळणीना
फसवतो हसून तू मुरलीवाला !!

खोड्या काढून बसे बाजूला
हसत पळतो पाहुनी यशोदेला !!

लुगडी चोरुनी मस्तीत रंगला
कलमावरी बसुनी पाही बासरीवाला !!

अगाध तुझ्या साऱ्या कृष्णलीला
तरीही अमुच्या ह्रदयी सदा तू
वेणूगोपाला!!

-------- देव पेडणेकर

## ***धुके आणि समाज.***

धुके होते पसरले
वस्तीत रे सकाळी
हे रोज असेच असते
मजला काय नव्हाळी

धुक्यात रमली वाट
पाऊल वाकडे पडले
जो टाचे खाली मेला
गणगोत त्याचे रडले

रुढीचे पसरले धुके
पुरुषार्थ अंध झाला
वंशदिव्याच्या बहिणीचा
गर्भात अंत झाला.

## ***डाग.***

[ षडाक्षरी ]
कोणी केली वस्ती
चन्द्राच्या रे पाठी
लपेल का डाग
कोण्या वेडीसाठी

लागला रे बट्टा
गड्या तुझ्या भाळी
कालची कौ मुदी
आज झाली काळी

रोज दर रोज
बघ नियमित
चंद्राचा तो डाग
कसा सराईत

कसा आला डाग
अरे तुझ्या माथा
कोण्या पुण्याईने
विचारू मी आता ?

प्रशांत पनवेलकर, वर्धा.
9970107591
prashant8panwelkar@gmail.com

### ➧ ***मृत्यू अन प्रेम***

मृत्यू अन प्रेम
दारावर दस्तक देत नाही
कधी येतील आयुष्यात
चाहूलही लागत नाही

मृत्यूच एक ठीक असतं
तो आल्यावर आयुष्यच संपून
जातं
पण प्रेम आल्यावर आयुष्यात
खंर जगणं सुरु होत असतं

मृत्यू सोबत साऱ्या वेदनाही
त्याच्या सोबत जातात
प्रेम आल्यावर खऱ्या अर्थानं
वेदना कळायला लागतात

एकवेळ मृत्यूला कवटाळणं सोप्पं
पण प्रेमाला कवटाळणं खूप
कठीण असतं
कारण स्वतःच अस्तित्व विसरून
एखाद्यावर प्रेम करणं खूप कठीण
असतं .

***चारोळ्या :---***

१} माणूस नेहमी दुसऱ्यांच्या
चूका शोधत रहातो
तो हे मानतच नाही
तो हि कधी चुकतो

-------------------------------------

२} जाहीर सभेतच देशाचा
स्वाभिमान जागृत होतो
निवडून आल्यावर त्याचा
लिलाव सुरु होतो

-------------------------------------

३} मी तुझा
फक्त तुझा
श्वासही कोठे
राहिला माझा

-------------------------------------

४} जे घडायला नको होतं
तेच घडून जातं
आपलं जगणं नियतीच्या हातचं
बाहुलं बनून जातं

-------------------------------------

५} आवडेल मला जगानं
तुझ्या नावानं ओळखायला
तुझ्या नावासोबत
माझं नावं घ्यायला

-------------------------------------

संजय एम निकुंभ
sanjaynikumbha@ymail.com

मो. ९८६०७२६५६०

नातं

तुझं न् माझं नातं

ऊंच-ऊंच वृक्षासारखं,
आकाशाला गवसणी घालणारं..!

तुझं न् माझं नातं
मृदु मऊशार गवतासारखं,
वादळातही घट्ट असणारं...!

तुझं न् माझं नातं
निरभ्र आकाशासारखं,
सारं काही स्वच्छ दाखवणारं...!

तुझं न् माझं नातं
खोल खोल सागरासारखं,
हृदयाच्या आत जाणवणारं..!

तुझं न् माझं नातं
उमलणाऱ्या फुलासारखं,
पवित्र नात्याचा गंध पसरवणारं..!

सुहास मुकंद मोरे
मोबाईल-९२२४१३८४८३
ई-मेल-moresuhas005@gmail.com

-----चारोळी-------------

तुझे हे आनंदी जीवन
फुलासारखे फुलत जावे,
मी मात्र फुल होऊन
तुझ्या केसात झुलत रहावे.

तू दूर गेलीस की
नेहमीच माझी असतेस,
जवळ तू असल्यावर
उगीच स्वप्न भासतेस.

पती-पत्नीच्या नात्यांमध्ये
विश्वासाचा सेतू असतो,
सारे जीवन आनंदात जावे
हाच त्याचा हेतू असतो.

लक्ष-लक्ष दीव्यांच्या ज्योती
मुखी तुझ्या उजळू दे,
साथ तुझ्या प्रेमाची
अशीच मला मीळू दे.

====================

जात ....
विचारू नका रे जात माझी ?
मी थोडा क्षत्रिय
थोडा ब्राम्हण
थोडा वैश्य
थोडा शुद्र सुद्धा आहे

मी मुसलमानही असतो
ईदी दरम्यान
शिरखुरमा खाण्यापुरता

ख्रिसमसच्या वेळी
मी आवर्जून ईसाई बनतो
अन २५ ते ३१ डिसेंबर
एन्जॉय करतो फुल्ल

रस्त्याने एखादा धाबा लागला कि
मी लगेच पंजाबी
नि दऱ्या खोऱ्यात .. जंगलात
फिरतांना
मी आदिवासी

एखादा गोरागोमटा किंवा
गोरीगोमटी
फोरेनर दिसली कि शेकह्यांड
करतांना
मी इंडियन

सणवारा नुसार अन
परिस्थितीनुसार
अनेक जाती बदलतो मी

सरकारी रकाना भरायचा असतांना
मी रखडतो त्यात
माझ्या टी..सी. वरची जात
नाईलाजाने

ईतर पूर्ण वेळी
मी फक्त माणूस असतो
हो ... माणूसच

तेवढी एक ओळख पुरेसी आहे
मला
जगण्यासाठी

संजय सिंगलवार

मज जमले नाही...



भरतीच्या या सीमा रेषा आखण्यास मज जमले नाही
लाट उसळता पाय टिकवुनी थांबण्यास मज जमले नाही

अस्सल मोती आठवणींचे जपुन ठेविले हृदयामध्ये
शेवटच्या ठोक्या पावेतो पाहण्यास मज जमले नाही

गुंतागुंत अशीच चिरंतन गुंतत गुंतत गोळा होई
या बोळ्याला दूरदूरवर फेकण्यास मज जमले नाही

चुरगळलेला चंद्र मिठीशी हळूच हसतो आणि बिलगतो
दंतव्रणाच्या खुणा हव्याशा टाळण्यास मज जमले नाही

रटाळवाण्या आयुष्याला दळण्याची ही गंमत आहे
किती पाखडा तरी सुखाला चाळण्यास मज जमले नाही

सुधाकर कदम

**उरला कवडसा**

अंधार दाटे भवति
सैर जाले मन
कानी शब्द धीराचा
नजरेस एक कवडसा ll
मृगजळ जणू भासे
रंग भावे छटांचे
कोण आपले परके
लोकहो भेद फुकाचे ll
पिरगटून दूर केले
पर्यायी नवी वस्त्रे
कळा सोसल्या फार
उपकाराचे दिंडोरे ll
राहिला हाती न हात
उपवर होता काळ
बोलणी कुचेष्टा बोचणी
उमगे हेतुपुरस्सर ll
अनुभव तो कसा – ई ? का !
घाव उर्मी निमाला
दाहक वास्तवाचा
हाती उरला कवडसा ll.....



( घनश्याम)
Ghanshyam Parkale gvparkale@gmail.com

## अथांग या गर्दीत

नाही कुणाचा ठावठिकाणा
कळसा काखेत ठेऊनी
शोधतो माझी सगुणा
नजरेत भरुन ठेवीली
प्रतीबिंबीत तुझी कल्पणा
जगायचे कसे आता
अंतरात तुझीच प्रतीमा
**sanjay R.**

डोळ्यात आसवांचे
थेंब झालेत जमा ।
प्रतीक्षा तुझ्या येण्याची
कधी संपेल ग रमा ।
उन पावसाची आता
नाही मजला तमा ।
नको अंधकारात लोटु
विझेल ही शमा ।

जिवन पाखरांचे
आनंदी स्वच्छंदी
आम्हास बघा
महादेवाचे नंदी
नाही आम्हा
कुठलीच बंदी
तरीही मोजतो
लांबी आणी रुंदी
सदानकदा दु:खी
पैशाचीच धुंदी
विसरलो माणुसकी
वेदनेतच आनंदी
sanjay R.

आठवणीत तुझ्या मी
विसरलो जग सारे ।
तुज शिवाय मज आता
सुचेना काही सारे ।
पण तुही कशी विसरली
सोबतीने बघीतलेली
स्वप्न तारे ।
वाहुन गेले घर वाळुचे
येकाकी सागर किनारे ।

संजय रोंघे

Sanjay.Ronghe@raymond.in

निस्तब्ध---

जाऊ द्या ,

झाले गेले विसरले ,

जेव्हा जीवनच सरले

तर मग जगात काय उरले,

पाषाण हि पडले असतात

पर्वताच्या रूपाने

झेलत हि असतात

पाऊस पाणी झंझावात,

पण अशात हि

ते शांत चित , साधू प्रमाणे,

कोणता हि न करत बहाणे

स्तब्ध असतात,

असे हि नाही उलट

हे सर्व झेलून हि ते निखारतात

हौशी माणसाच्या दिशेने,

उलट आकर्षण बनतात,

ओलावा विस्कालतात

धबधब्याच्या रूपाने,

सुंदर वनस्पती आणि वने,

जिंकतात सर्वांची मने,

तरी हि अबोला,

एक स्पर्श ओला

जगण्याच कारण बनतो,

म्हणून मी म्हणतो,

" खामोश पत्थर खामोश नही होते


दिल होता ही उनमे भी,

हर मौसम खामोशी से गुजारे

हद होती है जुलम- ओ - सितम कि.

संजय संगीत

Sanjay Hedaoo



# जरा हटके



# विडंबन

दादा कोंडके यांच्या 'एकटा जीव सदाशिव' चित्रपटातील 'काल रातीला सपान पडलं' या गीताची चाल विडंबनासाठी वापरण्यात आली आहे. यात कुणाचाही उपमर्द करण्याचा हेतू नाही.

---

काल दिसांला अवचित घडलं
बातमी फोडली कुणी अन् रुपये गडगडले
अन् डॉलरचा तो रेट बघुनी बाई म्हणाली काय घडले
आता सांगू कसा, बोलू कसा, राज तिथे तो खोलू कसा मी

तू तर झाला खुळा, न दिसतोय भोळा... घाबरून पाहू नको
मौनाचं तू सोंग घेवूनी लोकांसमोरी जाऊ नको...
थांब समोर तू जावू नको, थांब समोर तू जावू नको...

केला माझा घात तुम्ही अन् मी ओरडलो पुरे करा... त्या घोटाळ्यामंदी
फायलींचा तो घोळ घालुनी जनतेला ही दिला धडा... त्या घोटाळ्यामंदी
जाळपोळीचा खेळ खेळता कुणालाच हो नाय सोडले
अन् टीव्हीवरती न्यूज पाहुनी बाई म्हणाली काय घडले
आता सांगू कसा, बोलू कसा, राज तिथे तो खोलू कसा मी

तू तर बनला गड्डू, न लागलाय पड्डू... जागेवर राहीना
बाई तुझ्यावर खुशी, लागलीय भिषी, सोडलं जाईना
चल जनतेत शिरू नी जाहिरात करू... उगाच येळ आता लावू नको
पण युवराजाचे बोट धरुनी लोकांसमोरी जाऊ नको...
थांब समोर तू जावू नको, थांब समोर तू जावू नको...

शब्दांमध्ये पकडून मजला प्रश्न विचारले काही... अहो सभेमंदी
बोलण्यास ही काहीच नाही मौन सोडले नाही... अहो सभेमंदी
चुकी समजलो, बराच रडलो, “अर्थ” ही माझे गडबडले
अन् डोळ्यामधले अश्रू बघुनी बाई म्हणाली काय घडले
आता सांगू कसा, बोलू कसा, राज तिथे तो खोलू कसा मी

तू कारण पापाला, पाळलं सापाला, पडलं रे हे भारी... पडलं रे हे भारी
विरोधकांनी केली फितूरी, बालंट आलं तूझ्यावरी...
काय होईल ते होऊ दे, कोर्टात जाऊ दे, फिकीर त्याची करू नको
पण या गोष्टीतून धडा घेवूनी लोकांसमोरी जाऊ नको...
थांब समोर तू जावू नको, थांब समोर तू जावू नको...

मिलिंद जोशी,
नाशिक...
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~


~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

" म्हणींचा खजिना "

***********************************

म्हणी खूपच खऱ्या असतात ,आपलं हवं लक्ष
आजूबाजूच्या घटनांबाबत ,असायला हवं दक्ष

नीट पाहिलं दिल्लीकडे ,उघडून आपले डोळे
आठवतं कोळशाच्या दलालीत,होतात हात काळे '

चला चला अजून पुढे ,पहा भ्रष्ट साथी
आठवते का पहा म्हण ,'अती तिथे माती '

झोपेचे सोंग घेतलेला ,नसतोच होत जागा
ही म्हण आठवताच ,होईल तुमचा त्रागा

'अति झालं अन हसू आलं 'अशीसुद्धा आहे म्हण
घालू आता न चुकता ,घोटाळ्यावर आदर्श घण

आंधळं बिचारं दळतंय ,अन पीठ खातंय कुत्रे
बघा नीट डोळसपणे ,आसपासची चित्रे

चोर सोडून सन्याशाला ,दिली जाईल फाशी
नेतृत्वाच्या तोंडावरची उडणार नाही माशी

आई जेवू घालणार नाही ,भीक मागायला आडवा बाप
एक कि दोन किती सांगू ,भेजाला तर हजार ताप

नाव सांगायचे सोनुबाई ,कथलाचा पण हाती वाळा
कित्ती कित्ती म्हणी सांगू ,एकही खोटी नाही बाळा

पंत पडले राव चढले , असेही म्हणण्याचा प्रघात आहे
सारवासारव करताना म्हणावे , नजरचुकीने अपघात आहे

कोंबडं ठेवलं झाकून , तरी सूर्य उगवायचा नाही थांबत
सूर्यास्त आला जवळ की , खुज्यांची सावलीही असते लांबत !!!




पी हळद अन हो गोरी , असाही एक चिमटा आहे
हातचलाखी करणारा , खादीमध्येच भामटा आहे

कोल्हा राजी काकडीला , ऐकले असेलच नक्की
पहा पडताळून पदोपदी , खरी ठरते पक्की

सारा गाव मामाचा , एकही नाही कामाचा
दाम करी काम बाबा , रुबाब असतो दामा चा

नावडतीचे मीठ अळणी , पहा हसलात ना गालात ?
खोटी नाही ठरली म्हण , शे दोनशे सालात

लाभ ना नफा चाल झपाझपा , असेही म्हणणे रूढ आहे
कळले त्यालाच कळले , बाकीच्यांसाठी गूढ आहे

खजिना आहे म्हणींचा ,तरी उत्खननाचे काम नाही
म्हणी नसतील तर भाषेतसुद्धा ,अजिबातच ' राम'नाही
***********************************************
मुरारीभाऊ देशपांडे,संगमनेर 9822082497

वात्रटिका

@@@वसुली @@@

खासदारकी दिली मागेच,

कर पक्षासाठी मेहनत !

तुझ्या करिष्म्याने 'आयला'

मिळेल आम्हा 'मत' !

काय हवे ते माग,

तुला देवून टाकू !

प्रचाराला फिरायला फक्त

करू नकोस का कु !

- गजाभाऊ (गजानन लोखंडे )

वात्रटिका

@@@दुटप्पी पालक नीती @@@

प्रवेश घ्यायचा शाळेत

कि CONVENT शाळा आठवते !

पडेल मागे मराठी शाळेत ,

हिंग्लिश शिकण्या पाठवते !


चर्चा सत्रात पालक

झोडती भाषण झकास !

हाती आहे आपल्याच

म्हणतात मराठीचा विकास !

- गजाभाऊ



# चारोळी

सजवेन स्वप्ने सप्तरंगी
उल्हासित आयुष्याच्या संध्येची
चीतारतोय आठवणीं कॅनव्हास वर
पण रंग फेसाळताना उमटत नाही

-----------------------------

आठवणीत त्या क्षणांची
झुळूक येते अधून मधून
गुज सांडून अंतरी श्वासांची
सांजवेळी नभ येती दाटून

----------------------------------

थेंब थेंब शिंपल्या सरी
खळाळले हास्य गालावरी
मोहरला श्रावण सरसरूनी
तृप्त होऊन बेफान सई

----------------------------------

शोधता पाउलखुणा नजरेने
शब्दच आज निशब्द झाले
माणिक मोती लुटावेसे वाटे
स्फुरणारे भाव उसासे झाले

-----------------------------------

कुंजवनी सुरात न्हाली
भरून अंतरंगी तुशारली
हिरवाईची तू तनुबावरी
अवघी नंदनगरी मोहरली

--------------------------------------

शब्द समजती,शब्द उमगती
चिंब भिजून राधा ओशाळली
ओठांमधली ती अबोल प्रीती
हुंकारवाने आसमंतात पसरली

----------------------------------------

मैफिलीत मस्ती रंगतेय
इथे तुझ्या स्वागता वीणा रमते
ओसाड गावात वारी भिजते
रानातील रानफुल बेधुंद होते

------------------------------------

कैलास मांडगे

# कथा विभाग



"स्वर्गाची सहल .. वृषाली गोटखिंडीकर



दचकलात ना वाचून ..
हा कसला अविस्मरणीय प्रवास ..??
होय मित्रानो हा प्रवास आहे ज्याला पृथ्वीवरील स्वर्ग म्हणतात अशा "काश्मीरचा "
असे म्हणतात की जीवनात येवून ज्याने काश्मीर नाही पहिले त्याचे जीवन व्यर्थ आहे ..दोन वर्षा पूर्वी माझ्याही नशिबात हा योग आला !आम्ही जेव्हा एक मोठी ट्रीप करायची ठरवली तेव्हा आमचा पहिली निवड "काश्मीर "होती मग ठरवले "केसरी "बरोबर काश्मीर करायचे .दोन महिने आधी बुकिंग पण केले "दोन एप्रिलला आम्ही मुंबईत दाखल झालो श्रीनगर विमान प्रवासासाठी ..आणी योगायोग म्हणजे त्या दिवशी आपली वर्ड कप फायनल क्रिकेट म्याच पाकिस्तान सोबत होती आम्ही जिथे उतरलो होतो दादर ला तिथे रस्त्यावर मोठा स्क्रीन लावला होता मस्त म्याच पाहिली आणी ती जिंकल्याचा "थरार "पण अनुभवला !!!
संपूर्ण दादर भागात तेव्हा ..भयंकर धमाल चालली होती ..सुरवात अशी "हटके..आणी छान झाली !!!दुसऱ्या दिवशी सकाळी निघून ..अकरा वाजता श्रीनगर ला पोचलो
..........काश्मीर ला पोचल्यावर प्रथम गुलमर्ग पाहायला जाण्याचे ठरले यात तीन टप्पे असतात पहिला टप्पा .. उंची .८५०० फुट ..तन्मर्ग दुसरा टप्पा गुलमर्ग .उंची ..११५०० फुट . आणी शेवट खिलमर्ग उंची १३५०० फुट हवामान ठीक नसेल तर दुसऱ्या टप्प्या पर्यंत च फक्त जाता येते ,,
जाण्यापूर्वी मोठे गम बुट व फरचा कोट भाड्याने घेवून घालावा लागतो

इथे जाण्यासाठी जी रोप वे केबल आहे तीला “गोन्डोला”राईड म्हणतात त्यात बसून अक्षरश आकाशाला गवसणी घालणे म्हणजे काय हे अनुभवले !!

आमच्या सुदैवाने हवामान अनुकूल असल्याने आम्ही खिलमेर्ग पर्यंत जावू शकलो

तिथे बर्फ पण भरपूर असल्याने बर्फात खेळणे ,..बर्फातील स्केटिंग वगैरे मजा भरपूर घेतली ..बर्फात भरपूर लोळलो ..एकमेकांच्या अंगावर बर्फ टाकून खेळण्यात तर धम्माल आली !!इतक्या उंचीवरून पुण्यात फोन करून घरच्या लोकांशी बोलणे पण एक वेगळे थ्रील होते !! तेथे फक्त बिएसेनेल नेटवर्क .होते ...

परत येताना इतक्या उंचीवरून गोन्डोला राईड मधून बर्फाचे डोंगर पाहायला मस्त वाटत होते वरून भरपूर फोटो ..मोबाईल मध्ये गाण्यांचे पण विदिओ शूट घेतले आम्ही ..त्यानंतर दोन दिवस आमचा मुक्काम असणार होता हाउस “बोट “मध्ये

मग आमच्या स्वाऱ्या “दाल लेक कडे रवाना झाल्या .. “दाल लेक “एक अप्रतिम सरोवर आहे ..असे म्हणतात पंडित नेहेरू रोज दाल लेक चे पाणी पीत असत आम्ही गेलो तेव्हा भरपूर पाऊस चालू होता ..शिकार्यातून ..हाउसबोटी कडे जाताना पण डोक्यावर प्लास्टिक पांघरावे लागले .हाउस बोट ..एकदम देखणी सर्व सोयीनी युक्त होती आतून पाहिल्यावर वाटणार पण नाही की ही पाण्यात आहे .आणी लाकडाची बांधली आहे ..दोन दिवस तिथे रहाण्याचा अनुभव प्रचंड वेगळा होता .बाहेर भरपूर पावूस् कडाक्याची थंडी .. बोटीखाली ..तळ्याचे पाणी ..

भरपूर कपड्यांचे थर अंगावर असून सुध्ध्दा ..दात कडकड वाजत होते .. या थंडीत झोपण्याच्या बेड खाली पण हिटर होते ..तरीही थंडी भागायचे नाव घेत नव्हती ..बाहेरच्या खोलीत एक मोठी उंच शेकोटी होती ..आम्ही आमचा बराचसा वेळ तिथेच ..घालवायचो .येथे खास काश्मिरी पद्धतीच्या

जेवणाची चव चाखायला मिळाली शिवाय येथील खास पेय "कहवा "पण आम्हाला आग्रहाने प्यायला देण्यात आले तेथे आम्ही चार चिनार ..फ्लोटिंग गार्डन ..फ्लोटिंग शोप्स पहिली .
शिकार्यात बसताना कश्मीर की कली मधील "तारीफ करू क्या उसकी ".या गाण्याची हमखास आठवण होत होती ...!

यानंतर आम्ही दोन दिवस आम्ही तेथील निरनिराळ्या बागा पहिल्या यातील "निशात बाग .शालीमार बाग ..ट्युलिप गार्डन ..या बागां केवळ अप्रतिम !!
ट्युलिप गार्डन मध्ये फक्त" एप्रील" या एकाच महिन्यात फुले असतात त्यामुळे आम्हाला त्याची मजा घेता आली .ही बाग पाहताना "सिलीसिला "सिनेमाची आठवण झाल्या शिवाय राहत नाही .!येथे एक पुरातन शंकराचार्य मंदिर आहे ..तेथे वरून पूर्ण श्रीनगर व झेलम नदी दाल लेक पाहण्याची मजा येते .

यानंतर दोन दिवस पेहेलगाम येथे जायचे होते ते भारताचे "स्वित्झर्लंड" म्हणून ओळखले जाते तेथे जाताना पाम्पोर येथे केशराचे मळे पाहिले त्यानंतर "अवन्तिपूर "येथे विष्णुचे एक सुंदर मंदिर पाहायला मिळाले येथे क्रिकेट ब्याट फ्याक्टरी आहे .भारतातील सर्व ब्याट येथेच तयार होतात कारण त्यासाठी लागणारे लाकूड येथे तयार होते ..मात्र ब्याट ची मुठ मात्र आसाम मधून येते "तेथून पुढे मात्र भरपूर बर्फवृष्टी सुरु झाली "लीडर "नदी काठी आमचे हॉटेल होते चोहीकडे बर्फ ..बर्फ आणी फक्त बर्फ च होते ..!!!!सर्व रस्ते बर्फामुळे बंद असल्याने फार फिरता आले नाही मात्र बर्फाची खूप मजा घेतली ..काश्मिरी ड्रेस मध्ये "फोटो सेशन "केले पेहेलगाम ..हाच अमरनाथ यात्रेचा बेस क्याम्प आहे येथील नदीच्या काठावरील असलेल्या पोलीस स्टेशन मध्ये एका बोर्ड वर लिहिलेलं एक वाक्य मनाला स्पर्शून गेले WE DON'T SLEEP ..FOR YOUR "SLEEP !!!!खरेच काश्मीरमध्ये आपण मुक्त पणे सौंदर्याचा आस्वाद घेवू शकतो याचे कारण

..सदैव बरोबर असणारी भारतीय सेना
यासाठी येथील भारतीय लष्कराला धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत ..याचा आलेला एक “अनुभव “म्हणजे आम्ही गुलमर्ग वरून जेव्हा श्रीनगर ला परत येत होतो तेव्हा “लाल चौक “येथे जामा मशिदी जवळ झालेला स्कुटर मधील बॉम्बस्फोट !
या बॉम्बस्फोट मध्ये अचानक कर्फ्यू लावायला लागला तेव्हा मिलिटरी ने पर्यटक लोकांना अत्यंत सुरक्षित रित्या त्यांच्या हॉटेल वर पोचवायची व्यवस्था केली व काळजी पण घेतली ..!

या ट्रीप चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आम्हाला येथे सर्व प्रकारचे सिझन एका वेळी अनुभवायला मिळले ..एक म्हणजे ..आम्ही बर्फुले पाहिली ..हे ,म्हणजे बर्फ अक्षरश आकाशातून छोट्या फुलांच्या रुपाने अंगावर पडते !! भरपूर पाऊस ,,व कडाक्याची थंडी अनुभवली ..!! भरपूर बर्फाचा बेफाम पाऊस व त्यामुळे सर्व परिसर बर्फमय झालेला अनुभवला !! शिवाय भरपूर ऊन ज्यामध्ये बर्फाच्छादीत शिखराचे अत्यंत मनमोहक दर्शन झाले !!
.अशी ही काश्मीर सहल ..दोन वर्षे झाली तरी अजून त्याची “अनुभूती “कायम
आहे असे वाट्ते ..परत परत जावे आणी ..ही सहल करून यावी .!!!

वृषाली गोटखिंडीकर

➧ <u>अंदाज !</u> अरुण वि .देशपांडे -पुणे

---------------------------------------------------------------------------

आपल्या मनात खूप काही असते ,त्या प्रमाणेच प्रत्यक्षात तसेच घडेल असे मात्र नसते. त्यामुळे खुपदा आपले अंदाज चुकतात ,आणि भलतेच काही तरी घडून जाते ", आणि आपल्या वाट्याला "प्रेक्षकाची भूमिका येते , ही "बघ्याची भूमिका - पार पाडणे त्रास देणारे ठरते .

ओम -सकाळ पासून अशाच मानसिकतेचा अनुभव घेत होता . तो आणि त्याचा मित्र -राकेश , एकाच कार्यालयात नोकरीस ,बाजुबाजुच्या डेस्कवर असणारे -, जिवलग मैत्री "होण्यास काहीच वेळ लागला नव्हता .

मोकळ्या स्वभाव "- हा ओमच्या स्वभावातील सर्वांना आवडणारा गुण होता ,

नेमका उलट स्वभाव असलेला राकेश - हातचे राखून वागणारा ",असला तरी

त्याच्या व्यावहारिक वागण्यामुळे ", इतरांना "स्मार्ट-वाटायचा .".

असे असले तर - मैत्रीतली तडजोड म्हणून -ओम आणि राकेश यांच्यातील संबध

मैत्रीपूर्ण आहेत हे सर्वांना माहिती होते, अगदी एकमेकांच्या घरातील माणसाना

देखील ओम आणि राकेश हे "सख्खे- मित्र आहेत", हे माहिती झालेले होते.

ओमला गेल्या काही दिवसापूर्वी घडलेला एक प्रसंग आज ही जसाच्या तसा आठवला -"त्यादिवशी आफिस सुटन्या अगोदर - एक अर्जंट -मिटिंग "

म्हणून- मोठ्या साहेबांनी - ओम आणि राकेश , सोबत इतर काही जणांना

थांबून घेतले होते. नाविन कुठले ही प्रोजेक्ट येणार म्हणजे - त्या "टीमचा -

-लीडर - ओम किव्ना राकेश या पाकी एक असणार ", हे गृहीत धरले जायचे ,

पण या वेळी- "राकेश ने अगदी स्पष्ट शब्दात आपले मत सांगतांना म्हटले-

" मी या टीम मध्ये ओम असेल तर काम करणार नाही",मला स्वतंत्रपणे टीम

हवी आहे, ज्यात ओम नसेल, आणि ओमच्या टीम मध्ये मी नसेल."।!

मोठ्या साहेबांना धका बसला , इतर सहकारी थक्क झाले राकेशचे मत ऐकून.

ओम आणि राकेश यांना नेहमीच एकत्रपणे काम करतांना पाहण्याची सवय सर्वांना होती, आणि आता अचानक " हा वेगळेपणा कशामुळे ?, सर्वांना जितका धक्का बसला -त्याही पेक्षा जास्त धक्का ओमला बसने सहाजिकच होते . राकेश आपल्या विरोधात का बरे गेला असेल ?

या सवालाने त्याची झोप उडून गेली होति. तसे म्हणावे तर इतरवेळी राकेशच्या वागणुकीत काही फरक पडला म्हणावे तर -ते ही नव्हते , ओमशी

त्याचे बोलणे -वागणे अगदी नेहमीसारखे - जिवलग मित्रा सारखेच होते. ,

मग- आफिसच्या प्रोजेक्ट मध्ये त्याचे वागणे असे का झाले ? अंदाज येईना .

राकेश आणि ओमच्या रोजच्या व्यवहारात तसा काहीच फरक पडला नव्हता ,

दोघे रूम-मेट ,आफिसातून घरी आल्यावर नेहमीप्रमाणेच सगळे काही सुरळीत

पार पडत असे, एकमेकांच्या घरची चवकशी ,बाकीची ख्याली -खुशाली विचारणे,

एवढेच नव्हे तर- जेवण करतांना अगदी मोकळेपणाने गप्पा-टप्पा , बाहेर गेल्यावर

इतर मित्रांशी बोलणे - अगदी छान ,आनंदात होत होते.

मग राकेश- आफिसातल्या मिळून काम करण्याच्या विषयी असे का वागतोय ?

आपली सोबत त्याला का नको वाटते आहे?, असे तर नाही- ?त्याच्या मनात आपल्या

कामा विषयी, कामाच्या पद्धती विषयी काही प्रतिकूल भावना निर्माण झाली ?

ओमच्या या शंकेला फारसा अर्थ नव्हता - एका अर्थाने सगळ्या सहकारी-मित्रान मध्ये ,

राकेश पेक्षा ओमच अधिक पसंतीचा उमेदवार होता. ",

मग आपली ही लोकप्रियता राकेशला आवडत नाही का ?, म्हणून तर तो "आपल्या बरोबर

काम करायचे नाही , असे सांगतो आहे ",

या एका गोष्टीमुळे आपल्यात दुरावा येत असेल तर हे बरोबर नाही,

राकेश टीम-लीडर झाला "यात आनंदच आहे आपल्याला ", आणि

"या सठी आपल्या नावाचा विचार होऊ शकतो- हे ओमला माहिती होते ,

तरी मोठ्या मनाने तो "राकेशच्या हाताखाली काम करण्यास तयार होत.

आणि "आपल्या हाताखाली राकेशला काम करणे कमीपणाचे वाटते ?
म्हणून तर तो आपल्या टीम मध्ये काम करण्यास तयार नाहि. , हे कारण
असावे- राकेशच्या मैत्रीत दुरावा येन्याचे.
आपण मोठ्या साहेबांना सांगुया- सर, मी राकेशच्या टीम मध्ये आनंदाने
काम
करीन, मला त्यात काही कमीपणा नाही ", तुम्ही राकेशला नवे प्रोजेक्ट -
लीडर
जरूर करा . यावेळी माझा विचार करू नका
या विचाराने ओमच्या मनावरील ओझे कमी झाले , आपले नाते -आपली
मैत्री ,
आफिसाच्या बाहेर अगदी नेहमी सारखी आहे, त्याची काळजी नाही काही .
दुसरे दिवशी -आफिसात आल्यावर ओम आधी-मोठ्या साहेबांच्या केबिन
मध्ये
गेला . मागच्या मिटिंग मध्ये राकेश-काय म्हणाला ,कसे म्हणाला ", याची
पुन्हा
आठवण करून देत म्हटले ,
सर, राकेश या वेळी असा का वागला ? कळेना मला , माझ्या कामावरचा
त्याच
विस्वास उडाला कि काय ?, गेले अनेक वर्ष आम्ही किती प्रोजेक्ट केले ,
सगळीकडे
आमची जोडी प्रसिद्ध आहे, छान काम करन्या बद्दल . आणि अचानक
त्याला त्याच्या
टीम मध्ये मी नकोसा झालो आहे ?,

राकेश इतका बदलून गेलाय ? खरे वाटत नाहीये , त्याच्या वागण्याचा
अंदाज येत नाहीये मला.

मोठे साहेब ओम कडे पाहत म्हणाले - मित्र- वाईट वाटावे असे काही
झालेले नाही.

उलट राकेशच्या नावाचा विचार टीम-लीडर साठी "आम्ही मुळीच केला
नव्हता , आणि दोन वेगळ्या टीमचा कराव्या असे आमचे मत कधीच नव्हते
.

पण राकेश जेव्न्हा म्हणाला "ओमच्या टीम मध्ये मी काम करणार नाही
",

वेगळ्या टीम मध्ये मी असेन. तेव्न्हा मात्र आम्हाला वाटले तुम्ही दोघेजण
एकत्र काम करण्या ऐवजी वेगळ्या टीम मध्ये काम करावे , कारण "आहे
त्या

टीम मध्ये तुमच्या जागी राकेश टीम लीडर होणे - बरोबर नव्हते , आणि
नेहमीच

ओम लीडर ,आणि राकेश त्याचा सोबत, हे ही बरोबर नव्हते, त्याला हे
स्वतंत्र संधी

दिली पाहिजे . आणि राकेश म्हणाला मला- ओम ला बाजूला सारून, मला
तुम्ही

कधीच टीम लीडर करू नका ", मी दुसर्या टीम मध्ये जाईन , पण
माझ्याकडून

ओम वर अन्याय झाला असे मला वाटू नये . माझ्या भावना समजून
घ्याव्या साहेब

. सो, मी उद्याच्या मिटिंग मध्ये 'ओम बरोबर

काम करणार नाही असे सांगेन आणि बाजूला होइन.

नंतर तुंम्ही वेगळा निर्णय घेऊ शकता .

आता बोला ओम- राकेश असे का वागला ,? आला का काही अंदाज ?

अहो- आपल्या मित्राच्या भल्यासाठी तुमच्यासाठी तो असे वागला .

ओम साहेबांच्या चेहेर्याकडे पहात राहिला । अंदाज चुकणारे असुतात हेच खरे ।!

--

अरुण वि .देशपांडे -पुणे .मो-९८५०१७७३४२ .

-----------------------------



“गजाची आई"..... संतोष दत्तु पाटील.

---

गजानन उर्फ गजा, हा आमच्या सर्व मित्रमंडळी पैकीच एक. पण या सर्व मित्र मंडळीत व गजात एकच साम्य होते व ते त्याच्या विलक्षण हास्याचे.

गजानन आमच्या कॉलनीत राहायला आला तेव्हा अगदी दोन वर्षाचा होता. आपल्या आई बरोबर म्हणजे सुमाताई बरोबर लहानगा गजा आला.

आमच्या चर्चेला एक नवीन विषय मिळाला. त्याच दिसण, हसण, सांर काही अगदी जीव ओवाळून टाकावा असंच. कधी कधी वाटे संपुर्ण भारत वर्षात जरी शोधले तरी इतका विनम्र निरागस मुलगा मिळणार नाही. बघता-बघता हा गजानन अठ्ठावीस वर्षाचा झाला.पण वय वाढल तरी वयासोबत येणारी प्रौढ पणाची लक्षणे काही गजाननाच्या एकुन वागणुकीवरून वाटत नव्हती.

वय, शरीर अठ्ठावीस वर्षाच, पण मन- बुद्धी मात्र,एका कोवळ्या पाच वर्षाच्या मुलाची.ज्या पाच वर्षाच्या मुलातआढळणारा अवखळपणा-निरागस पणा-डोळे, आजही गजाच्या आठवणी "ओल्या करून जातात. सुमाताईच ऐन तारुण्यात वैधव्य व या वैधव्याला असणारी जगातील एकमेव आशा म्हणजेच त्यांना वर्षभरात झालेले एकमेव अपत्य गजानन. वयाची ऐन तारुण्याची उमेद सुमाताईनी गजाननच्या संगोपनासाठी खर्च केलेली. शिक्षण कमी असल्यामुळे चार घरची भांडी कुंडी घासली, धुणी, पापड लाटन इत्यादी कामे सुमाताई करत असत.आपल्याला लाभलेल एकमेव आयुष्यातील सुख म्हणजे आपला मुलगा गजानन हाच त्या मानत, गणपती मंगलमूर्ती गजानन, त्यावर या

सुमाताईची नितांत श्रद्धा होती म्हणूनच मुलाचे नाव देखील गजानन ठेवले.

साधारणतः चार वर्षाचा असताना सुमाताईनी गजाननला एका बालवर्गात टाकले. वर्गातील बडबडगीते , येरे-येरे पावसा तुला देतो पैसा, नाच रे मोर नाच आंब्याच्या वनात , सांग सांग भोलानाथ ही गीते तोंडपाठ असलेला गजानन पहिल्याच वर्षी पहिलीला पहिला नंबर मिळवून मोकळा झाला. त्या पहिल्या नंबरच कौतुक होत ते फक्त त्या माऊलीला संपूर्ण कॉलनीभर हा निकाल सांगून साखर वाटत सुटलेल्या सुमाताई मला अजून आठवतात.त्यांच्या भावी जीवनातील सुखी जीवनाची लहर घेऊनच येईल असे आम्हाला वाटले. बघता बघता हा ‘गजा’ चक्क चवथीला गेला व शाळेतील परीक्षेत त्याच प्रमाणे शाळेतल्या शिष्यवृत्ती परीक्षेत पहिला आला.गजाला शिष्यवृत्ती मिळाली आता
त्याच्या या शिष्यवृत्तीने त्याच्या शिक्षणाचा प्रश्न , दहावी पर्यंत तरी सुटणार होता.पण दैवाला दुसरेच काहीतरी मंजूर होते त्या घटनेने गजाचे व सुमाताईचे आयुष्यच बदलून गेले .
चवथीला 'गजा' खूपच ,समंजस व सु& धन्य होता .

शाळेतल्या एका मधल्या सुट्टीत आपल्या मित्रा बरोबर शाळेच्या मैदानात खेळत होता तेवढ्यात शाळेसमोरील रस्त्यावर कशाचा तरी जोरदार गलका ऐकु येऊ लागला, जोरात घोषणा, जोरात आवाज यामुळे ही काही लहान मुले, घाबरली व काही काय झाले,म्हणुन पहायला रस्त्यावर आली. तोवर रस्त्यावर दोन गटांमध्ये दगड फेक चालू झाली होती . ही मुले अजुनच पुढे आली. आणि नकळत एक- दोन दगड या मुलांच्या डोक्यावर आदळले .त्यात एक गजाही होता.दगडाच्या या आघातामुळे त्याच्या डोक्याला इतका जबरदस्त मार बसला कि,त्यातुन जो रक्ताचा पाट वाहिला त्यातुन तो जगतो की नाही, असेच आम्हाला वाटले.पण, दैव बलवत्तर होते , गजा वाचला .

मेंदूवर झालेल्या जबरदस्त आघातामुळे हा मुलगा स्मरणशक्ती गमावून बसला सुरवातीस हा तर सुमाताईनां ओळखत नसे अन हळूहळू गजाच्या दुर्दैवी प्रवासास सुरवात झाली .गजाचे शाळेत जाणे सुटले.डॉक्टरांनी सुमाताईनां या मुलाला पूर्ण विश्रांती द्या, काही त्रास ,त्राण देऊ नका असे सांगितले.तळहातावरील फोडा प्रमाणे सुमाताई गजाची काळजी घेत होत्या.दिवसांमागुन दिवस गेले. वर्षे गेली, गजाच्या वागणुकीत काहीच फरक नव्हता. दिवसभर हा शेजाऱ्यांच्या लहान मुलां बरोबर गोट्यांचा डाव मांडून खेळत असे. दुपारचा जेवून झोपत असे,पुन्हा दिवस सारखा.लहान मुलांना हा ऐवढा, आपल्या पप्पा एवढा माणूस आपल्याशी गोट्या खेळतो, याचे आकर्षण वाटे, व खुप चिडवत असत .पण हा कधी त्यांच्यावर रागावत नसे, मधुन मधुन येवून ,सुमाताईना मला 'सुसू' ला आली, मला 'शी' ला आली असे सांगे. व सुमाताई त्याच्या पायजम्याची नाडी सोडुन ती बांधे पर्यंत सर्वच करीत असत, गजा अठ्ठावीस वर्षाचा होई पर्यंत सुमाताई कधी त्याला सोडुन, कुठेच गेल्या नाहीत अगर आपल्या लाडक्या पाडसाला सोडुन कुणाजवळ ठेवले ही नाही.

कधी कधी गजा आमच्याकडे यायचा ,मला भोलानाथचे ,मोराचे गाणे म्हणुन दाखवायचा .दिवाळीचा नवा शर्ट,संपुर्ण कॉलनीत दाखवणारा गजा हा एकटाच मी सांगेन ते काम हसुन करणारा मी त्याला बहुतेक वेळा ,जा पेपर घेवून ये, जा दुकानातून दाढीचे ब्लेड घेऊन ये अशी किरकोळ कामे सांगताच ती पटकन करणारा. आमच्या घरी येवून, टाईम्स ऑफ इंडियातील चित्रे न चुकता पाहणारा ,मी कधी कधी गजाला लग्न करतोस का ? विचारे,लग्नाच्या नावानेच गजा कोठेतरी हरखून जायचा , व पुन्हा लाजून हसायचा .

एकदा सकाळीच सुमाताई आमच्या कडे आल्या, मला म्हणाल्या अरे तु दुनियेला कामाला लावतोस, माझ्या पण मुलासाठी बघनारे नोकरी. मी एका जवळच असणाऱ्या कार्यालयात शिपायाची नोकरी गजासाठी पहिली,

व गजाचा गजाशेठ झाला. रोज सकाळी छान पैकी भांग पाडून शर्ट-प्यान्ट व्यवस्थित घालून गजा येत असे. येताना एका मोठ्या पिशवीत,ज्यात दहा किलो तांदूळ मावतील अशात डबा घेवून यायचा , पण हे काम फक्त वीस दिवसच केले. पुन्हा हा आपल्या मार्गाला .......आम्ही त्याला बरेच वेळा सांगायचो,अरे गजा तु आता मोठा झालास, तेव्हा निट मोठ्या सारखा वाग. त्यावर तो म्हणायचा 'दादा मोठ्या सारखं म्हणजे कसं वागायचे ? व मलाच निरुत्तर करायचा. त्याच्या त्या निरागस पणाचे मला व सुमाताईस खुपच कौतुक होते.एकदा शेजारच्या एका मुलीने,सुमाताईकडे तक्रार केली.तुमच्या या गजाला काहीतरी सांगुन ठेवा, येता जाता माझ्याकडे पहात असतो, आईने गजाला खुप समजावले,असे करू नये बाळ, चांगली मुलं अस करत नाहीत ,त्यानंतर मात्र गजाने अशी खोडी परत नाही केली.

एक दिवस सकाळीच ,सुमाताईचा जोरात आक्रोश आम्हाला ऐकायला आला .म्हणुन आम्ही सुमाताई कडे लगेच गेलो.तर, त्या रात्रीच डोक्यात मेंदूचा रक्तस्त्राव होवून ,गजा आम्हाला सोडुन गेला होता.

सुमाताई एकट्या झाल्या ज्या आशेवर त्या आपल्या आयुष्याचा एक एक दिवस ढकलत होत्या ती आशा आता संपली होती.आपला मुलगा हा खुप हुषार,समंजस आहे असे सुमाताईना वाटे. हा आज ना उद्या चांगला होईल, मग लग्न करील व आपल्याला खुप सुखाचे दिवस येतील. असे सुमाताईना वाटे.गजासाठी त्यांनी खुप हालअपेष्ठा काढल्या ,नाना उपवास केले,?षी केले. पण सर्व व्यर्थ ......

ताई च्या या कष्ठाना कधीच यश नाही आले.समाजाने सदैव उपेक्षित केलेल्या आपल्या पोटच्या गोळ्यासाठी त्यांनी दिवस-रात्र एक केली होता त्यानंतर एका महिन्यातच सुमाताई गेल्या,गजाच्या मृत्यूमुळे अन्न पाणी वर्ज्य केलेले.डॉक्टरी उपचार थांबलेले फक्त एकच ध्यास,व

आजारातच बडबडणे
"आता त्याच्या कडेच जायचे, आईला एकटा सोडुन जातोस काय? अरे लबाडा, बघा बघा कसा पळतोय, अरे थांब रे. हा एवढासा एकच घास तर खा, नाहीतर बघ तिकडून बुवा येईल, खा - हा चिऊचा घास......., नीट आंघोळ कर, साबण लावू का ? अरे किती घाम आलाय तुला, जा काहीतरी खा - जा,हे बघ चिवडा तुला आवडतोय ना ,खा -खा ." या वेडातच एका झटक्याने सुमाताई गेल्या. एका मुलीचा 'अध्याय ' कायमचा बंद झाला.

मो.नं:- 9820986659
email:- santosh.patil_2007@rediffmail.com

~~~~~~~~~~~~~


~~~~~~~~~~~~~

'बाहेरख्याली'...... अनघा हिरे

कितीदा स्वप्नवत भासतं. जायचे असते लांब लांब त्या क्षितिजाच्या पलीकडे पण जाता येतंच नाही . अनुबंध आहेत कि फक्त नुसतेच भटकतेय. दिशाहीन अन निश्चल , निर्विकार..

आज न राहवून सोनालिका स्वप्नीलच्या आठवणीने व्याकुळ झाली.पण काल खूप काही बोलून गेला रे . राग नाही आला तुझा पण मन दुःखी झाले . तू सुद्धा समजून घेऊ शकला नाहीस काल बोलता बोलता किती बोलून गेलास रे..

म्हणजे तुझ्याही मनात आल्याच ना त्या गोष्टी? वाटत होते आपल्या प्रेमात ह्या सर्व गोष्टीना क्षुल्लक स्थान आहे.

'बाहेरख्याली पणा' शब्द खूप लागला रे मला . ठीक आहे तुला माझ्याबद्दल बोलायचे नव्हते पण शब्द सुद्धा हाच सुचला ना तुला ?

प्रेम आणि प्रेमाच्या आविष्कारातून झालेली कृती बाहेरख्याली वृत्ती कशी काय असू शकते ज्या कृतीतून दोघांनाही गिल्ट आला नाही. ते सर्व काही चूक कस काय असू शकत रे..

विचार करून सोनालीकच डोक फुटायची वेळ आली पण उत्तर काही मिळत नव्हते .

अचानक पायाखालची जमीनच खेचून घेतल्या सारख तिला वाटायला लागलं, आणि तिला ह्या अश्या अवस्थेत टाकणारा कोण ? तर तिचा जिवलग ,

जीवापाड प्रेम करतो ना आपण त्याच्यावर मग त्याच्याच तोंडून हे असले शब्द . ....

सर्व नकोस झालेलं असतांना कुठून तरी एक आशेचा किरण चमकावा तसा त्याचा तिच्या आयुष्यातला प्रवेश मग अचानक सार काही सुखकारी घडतंय

असा वाटणारा भास .. ओढ आतुरता ... हुरहूर सर्वांना बरोबर घेऊन एका क्षणाला पूर्ण पणे त्याचे होऊन जाण्याचे स्वप्न.... . भेटीची इच्छा ....व्याकुळता अन भेटी नंतर मिलनातून मिळालेली तृप्ती , सार सारकाही सुखदाईच होत . मग आता असे अचानक काय झाले ? का सोनाला उदास वाटू लागले.

प्रेम म्हणजे नेमक काय होत तीच ! एका पर पुरुषाच्या शरीराचे आकर्षण की त्याच्या स्पर्शाची ओढ की फक्त शरीर सुख ? छे! हे असलं काही नव्हत मग नेमक काय आणि बाहेरख्याली हा शब्द एव्हडा मनाला का बोचला तिला? तस म्हटलं तर एक प्रकारे ते सत्य तर होत नवरा असतांना पर पुरुषाच्या प्रेमात पडलेली, चाळीशीची स्त्री होती ती .इतके वर्ष कधीही असे घडले नाही मग ह्या वयात तिचे असे परपुरुषाच्या प्रेमात पडणे खरच नेमक काय होत प्रेम की वासना? शरीर सुख? हे तर तिला तिच्या नवर्याकडून मिळत होते (?) म्हणजे नित्य नियमाने नवरा ते देतोच. जरी त्याच्या स्पर्शात आपले पणा नसला तरी काय झाले आणि तिच्या मनाचा त्याने विचार केलाच पाहिजे असा काही नियम नाही . जरी वासनेने तुडुंब भरलेला , गलिच्छ हालचाली आणि हावभाव करणारा तो असला म्हणून काय झाले त्याने काय फरक पडतो स्त्रियांना ह्या बाबतीत स्वतःचे मत नाही म्हणून तिला प्रेम करण्याचा अधिकार नाही तिला तिचा मानसिक आधार शोधण्याचा अधिकार नाही.

विचारांच्या धुक्यात जात्तांना त्याचे जीवघेण्या धुराळ्यात कधी रुपांतर झाले सोनाला समजलेच नाही .

आधार ....केअर टेकर ......

आता हे फक्त शब्दाचे बुडबुडे आहेत का? आपल्याला आधार वाटणारा व्यक्ती आपल्या आयुष्यात पहिल्यांदा का आला नाही जरी आला असता तरी तो तितकाच संवेदनशील बनून आपल्या आयुष्यात राहिला असता का? की

कालांतराने हे पण नाते बदलले असते . स्वप्नवत वाटणारे वास्तविक रुपात कसे असेल कुणालाच सांगता येत नाही

हुश्श्शश्श्श्श ..............................

विचारांच्या गर्दीत सोनाने एक निश्वास टाकला.

एक भोग वस्तू म्हणूनच सोनाकडे बघणारा तिचा नवरा नित्य नियमाने सोनाचा नाजूक पण कुस्करत होता तरी देखील चेहऱ्यावर हसू आणि मनात तिरस्कार ठेऊन ती कायमच त्याच्यापुढे झुकत होती .कुणालाही विश्वास बसणार नाही वर वर साधा सरळ दिसणारा मनुष्य वास्तविक पाहता एक विकृत हिंस्त्र पशुच होता . एखाद्या बलात्कारी माणसाचा चेहरा या पेक्षा वेगळा तो काय असणार! सर्व आवेगातून बाहेर पडल्यावर सोनाच्या अंगावर पैसे फेकताना आपण नेमके कोण असा प्रश्न सोनाला पडल्या शिवाय राहत नव्हता.

विकृती करणाला पुर्षार्थाचे नाव देणे आणि त्या वागण्याचे समर्थन करणे असे असतांना सोनाच्या मनाची , तिच्या भावनांची कोण काळजी करणार ?अशा परिस्थितीत जगत असताना तिचा आधार, तिचा विश्वास, तिचे प्रेम स्वप्नील हे काय बोलून गेला.

न राहवून तिने स्वप्नीलला फोन केला '

"हॅलो ..हः "

"हॅलो ,बोल ग सोनू "

" काही नाही"

"अग , काय झाले? तुझा आवाज असा का? काय झाले तुला? का बोलत नाही? "

"......................अ ......................."

स्वप्नील क्षणाक्षणाला अस्वस्थ होत होता सोनाला नेमक काय झाले , ती अशी तुटक का वागते, त्याला काही केल्या समजेना.

"हे बघ सोनू, मी तुला चांगलेच ओळखतो. सांग ना तुला काय झाले ? कसला राग आलाय ? "

" तू हे काय बोलून बसलास स्वप्नील, तुला हे कस काय बोलवलं गेल रे ? अरे प्रेम करतेय रे मी तुझ्यावर.माझ्या प्रेमाला तू हि काय उपमा दिलीय "

"ओह ... अग राणी तू काहीही चुकली नाही. तुझ प्रत्येक वागण चांगलाच आहे. अग पण तू इतकी सोशिक आहेस नवर्या कडून एव्हडा छळ सहन करतेस म्हणून सांगतो तुला तू जरा वाचा फोड ह्या प्रकरणाला . काल मी जे शब्द बोललो ते शब्द लक्षात ठेवलेस आणि त्या मागची भूमिका ती नाही का लक्षात आली तुझ्या? अग राणी हे माझे शब्द नाही हे शब्द तुला ऐकावे लागणार आहे आणि तेही तुझ्यावर अन्याय करणारेच तुला हे शब्द ऐकवतील आणि स्वतः तुझ्या समोर ताठ मानेने जगतील. हे बघ दोन्हीकडून हार तुझीच होणार आहे, तुझ्यावर अन्याय करून सुद्धा ते तुला बाहेर आधार शोधायला गेली म्हणून डिवचत राहतील मग का अन्याय सहन करतेस ? लोकांना ही कळू दे तुझ्यावर काय काय अन्याय होतो ते. तुझ हे शांत आणि सोशिक राहण मला नाही पटत तुझे तुलाच लढायचे आहे येथे मी तुला आधार देऊ शकतो पण लढायला साथ नाही ."

"किती हर्ट करतोय मला "

"अग , वास्तवतेची जाणीव करून देतोय तर एव्हडी हर्ट होतेय आणि उद्या सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या परिस्थितीने किती हर्ट होशील हे नाही का लक्षात येत? अग राणी मी तुझ्यासोबत आहेच ना . पण तुझी ही लढाई तुला एकटीनेच लढावी लागणार आहे ...मॅडम....काय म्हणतोय मी समजलं ना .....कुठे हरवली आहेस... नॉर्मल हो सोनू ..."

इतका वेळ रोखून ठेवलेला सोनाचा बांध फुटला लहान मुलासारखी सोना ढसा ढसा रडू लागली .

"हरवणे काय असते तुला काय समजणार. तुला हरवण्याच्या भीतीने माझी काय वाईट अवस्था झाली होती "

बोलणे आणि हुंदके सोनुला दोनही काम नीट जमेना

" अरे यार चुकल माझ मला नव्हत माहित माझ्या ह्या वाक्याने एव्हडी दुखावशील .. माफ कर मला"

" नाही , नको तू माफी नको मागुस"

स्वप्नीलच्या बोलण्याने सोना दुखावली होती आणि आता त्याच्याच बोलण्याने नॉर्मल सुद्धा झाली. सोनाने अलगद स्वतःला स्वप्नीलच्या स्वाधीन केले. स्वप्नीलने सुद्धा नेहमी प्रमाणेच तिच्या चेहऱ्यावरचे केस बाजूला केले. त्याने प्रथम सोनाच्या कपाळाचे चुंबन घेतले. तो तिच्या वर चुंबनाचा वर्षाव करत राहिला. त्याने हळूच तिच्या कानाजवळ आपला चेहरा नेला आणि तो हळूच पुटपुटला."रानो झाली का शांत आता ठेवू का फोन ?" तितक्याच अधिरतेने तिच्या तोंडून शब्द आले "नको रे थांब ना अजून थोडा वेळ."

सोनुला इतका कसा त्याचा मानसिक आधार वाटत होता तिचा नवरा रमेश हा तर स्वप्नील पेक्षा बराच मोठा होता मग नवर्या पेक्षा लहान व्यक्तीत तिने कसा काय आधार शोधला ? रमेश नावाला मोठा होता परंतु स्वप्नील मध्ये असणारा समंजस पण त्याच्यात नव्हता . नवरा हे वेगळ केमिकल तिच्या आयुष्यात होत जे ती गिळू ही शकत नव्हती आणि ओकुही शकत नव्हती. उच्च शिक्षित ,ऑफिसर असलेला तिचा नवरा वागण्यात एकदम गावनढल होता . रानटी , क्रूर ,दृष्ट राक्षस म्हणजे रमेश आणि त्या दुष्ट राक्षसाच्या तावडीतून सोडवायला आलेला राजकुमार म्हणजे तिचे प्रेम तिचा स्वप्नील. परंतु खरच स्वप्नील राजकुमार बनण्या इतके धेर्य बाळगून होता का? राजकुमार तर राक्षसाच्या तावडीतून राजकुमारीला सोडवतो पण सोनाचा हा राजकुमार तर तिला एकटीलाच लढायला सांगतोय .

सोना आणि एकटी लढणार अवघडच आहे. तिला एकटीला लढायचे असते तर पहिलेच २० वर्षां पूर्वीच लढली असती. जेव्हा तिच्या नवर्याच्या विकृतीचे रूप तिच्या पुढे आले होते. कोणीच सोनाची बाजू घेतली नव्हती कोणीच तिला न्याय दिला नव्हता . नवरा बायकोच्या मधले भांडण म्हणून सर्वानीच त्याकडे दुर्लक्ष केले.

'अरे पण का? का तुम्ही लोक मला न्याय देत नाहीये. आहो बघा जरा ह्या माणसाकडे बायकोला कसा जनावरासारखा मारतो आणि मारून मारून थकल्यावर थकवा घालवायला तिला लगेचच अंथरुणात ओढतो..तिचे लचके तोडतो . हा बायकोला फक्त भोग वस्तू समजतो हा कसला पुरुष हा तर .......'

तोच तो दिवस आणि त्या नंतर आलेले प्रत्येक दिवस मनातला ज्वालामुखी सोना ने सारखा सारखा दाबला .

बरोबर आहे स्वप्नीलचॆ मला लढलेच पाहिजे

माझ्या दुखाचा अंत मी करणारच . एक क्षण तिच्या मनात आले कि स्वप्नीलच्या आणि तिच्या नात्या विषयी रमेशला सांगावे . पण रमेशची इतकी समजून घेण्याची कुवतच नव्हती त्याने

त्या नात्याकडे खूपच गलिच्छ नजरेने बघितले असते . त्याला काही सांगण म्हणजे आ बैल मुझे मार असेच झाले असते.

एके दिवशी

सोनाने ठरवलेच आता बस आता ह्या सर्व गोष्टीचा सोक्ष मोक्ष लावायचाच .

"रमेश बस झाल आता, आता तसाच तिथे उभा राहा . मला नाही माहित आता तू कसा रिअक्ट होशील तू मला आता मोकळ कर मला जाऊ दे .माझ दुसर्या कुणावर प्रेम आहे ,माझ्या आयुष्यात आता तुला जागा नाही .

"बाहेरख्याली पणा करायला लाज नाही वाटली थांब तुझ्या घराण्यालाच तुझे थेर बघायला बोलावून घेतो "

रमेश हातात जे मिळेल त्याने सोनाला मारत सुटला सोना पुन्हा पुन्हा
गगनभेदी आक्रोश करत होती परंतु मनातल्या मनातच
त्याने धडा धड मोबाईलवर नंबर फिरवले आणि खूप सार्या लोकांना
त्याने घरी बोलावले .म्हणता म्हणता सारे नातेवाईक जमा झाले
सोनाच्या सासरचे सोनाला वाईट चालीचे ठरवून मोकळे झाले
" नवरा सोबत असताना
हे थेर सुचतातच कसे आता तुमच्या मुलीला धन्द्यालाच बसावा ."
भर सभेत सोनाच्या चरित्रावर शिंतोडे उडवले गेले .
"खाल मुंडी पातळ धुंडी आहे तुमची मुलगी .. रंडी कुठची "
रमेश घाणेरडे बोलून त्याच्यास्वभावाचे दर्शन घडवून आणत होता.
"बस झाली तुमची बडबड आम्हाला माहित आहे आमची मुलगी
अशी वागणारच नाही तुमच्या मुलाने आमच्या मुलाचे पार वाटोळे केले.
बघ सोना बघ, तुला सांगत होतो ना आम्ही, ह्या नराधमापासून वेगळी
हो तेव्हाच मुक्त झाली असती. सांग सोना त्यांना हे सगळ खोट आहे ते"
सोनाच्या बाबांचा हा रुद्र अवतार पाहून सगळे शांत बसले .
"बाबा आहो हे सगळ खर आहे...... माझ खरच दुसर्या व्यक्तीवर प्रेम आहे"
"कोण?"
"स्वप्नील"
"स्वप्नील?कस शक्य आहे ते ! कुठे आहे तो? "
"बाबा हा काय माझ्या शेजारी बसलाय हा स्वप्नील तर आहे "
स्वप्नीलचा हात हातात धरत सोना बोलली .
ज्यांनी ज्यांनी ह्या प्रकरणात सोना विरुद्ध तोंड सुख घेतले
ते सारे अवाक होऊन
सोनाकडे बघायला लागले . सोनाचे सगळ्यांसमोर स्वप्निलशी संवाद चालू
झाले. स्वप्नीलचे तिला धीर देणारे वाक्य तिला बंड करण्यास मदत करत
होते आता भर सभेत शांतता पसरली .

हे काय चालू आहे सर्वांना समजेच ना.

सोनाच्या आईला अश्रू आवारात येईना आता तिला फक्त तिच्या लेकराची काळजी वाटत होती.

"माझ्या बछड्या अग भानावर ये ग सोनू, अग स्वप्नील नाहीये ग इथे . तो इथेच काय तर ह्या जगात सुद्धा नाही तो तर २५ वर्षापूर्वीच हे जग सोडून गेला आहे ग.

भानावर ये माझ्या राजा . स्वप्नील नाहीये "

" लग्ना आधीही आई बाबा असेच काहीतरी बोलायचे बर का स्वप्नील तेव्हा मी त्यांच्यावर विश्वास ठेवला होता आता मला कुणावरच विश्वास ठेवायचा नाही. स्वप्नील तू म्हणत होता ते एकदम बरोबर आहे शेवटी ह्या जगाने मला बाहेरख्याली ठरवलेच चल मला घेऊन चल तुझ्या बरोबर . मला नाही राहायचं ह्या जगा बरोबर ."

सोनाने रमेशचे घर कायमचेच सोडले

आणि आता ती सुखाने संसार करतेय स्वप्नील बरोबर

मेंटल हॉस्पिटलच्या दहा बाय दहाच्या खोलीत .

....(end )......

अनघा हिरे

~~~~~~~~~~
~~~~~~~~~~

# मानिनी



## स्त्री.... मंदाकिनी रासकर

स्त्री म्हणजे काय फक्त एक भोगवस्तू आहे ? तिला स्वतःचे असे काही अस्तित्व आहे कि नाही ? पोटात मुलीचा गर्भ असला तर पोटातच तिला मारायला पाहतात . पण तो गर्भ वाढतो कुणाच्या पोटात ? एका स्त्रीच्याच पोटात ना , कि पुरुषाच्या ? स्त्री च जर जन्माला नाही आली तर पुरुष कसा जन्मणार ? मुल जन्माला घालताना असंख्य यातना स्त्रीने सहन करायच्या , पण जन्मल्यावर नाव मात्र वडिलांचे लागते . मग आईचे नाव ही का नाही लागत ? तिला काहीच महत्व नाही का ? लहानपणापासून मुलगा आणि मुलगी हा भेदभाव होतो . मुलीनाही मुलां सारखेच सर्व अधिकार का नाहीत ? कुठेना कुठे काहीना काही कमी असतेच मुलगा आणि मुलगी बरोबर वाढवताना . मुलांना सर्व सुखसोयी आणि मुलीना मात्र फक्त कामं सांगितली जातात . मुलांनी रात्रभर बाहेर राहिले तरीही चालते पण मुलीनी मात्र अंधार पडायच्या आत घरात यायचे . पदोपदी तिच्या नारीत्वाला धोकाच असतो . ती घरातही आणि बाहेरही का सुरक्षित जगू नाही शकत ? तिला तिच्या स्वप्नांना का मनातच मारावे लागते ? युगानुयुगे चाललेली तिची हि घुसमट कधी थांबणार ? ती कधी नारीची नारायणी होणार ? पहावे तिकडे वासनेने भरलेल्या नजरा तिला सहन कराव्या लागतात . गर्दीच्या ठिकाणी देखील तिला स्वतःची काळजी घ्यावी लागते कि कुणी आपल्याला स्पर्श तर नाहीना करणार मुद्दाम ? किती किळसवाणी गोष्ट असते हि , ते एक स्त्री च समजू शकते फक्त . त्या पुरुषांना त्या वेळेस त्या स्त्री मध्ये आपली आई किंवा बहिण का नाही दिसत ? मुल जन्माला घालताना असंख्य यातना स्त्रीने सहन करायच्या , पण जन्मल्यावर नाव मात्र वडिलांचे लागते . मग आईचे नावही का नाही लागत ? तिला काहीच महत्व नाही का ? काही ठिकाणी तर नवराच एखाद्या वृद्ध पुरुषाला थोड्या पैशांसाठी आपल्या बायकोलाही विकताना पाहिले बातम्यांमध्ये . हे सर्व

पाहून आता मन सुन्न होतंय . या सर्व गोष्टी आता रोजच्याच वाटू लागल्यात . बलात्कार झाला तर तिने तोंड लपवायचे पण ज्याने हे काळे कृत्य केले त्याने मात्र उजळ माथ्याने मिरवायचे . अशा नराधमांना तिथेच फाशी दिली पाहिजे .पण नाही वर्षानुवर्ष खटले सुरूच राहतात रेंगाळत नुसते . लाज वाटते आता या सर्व गोष्टी रोज रोज घडताना पाहून . रोज एक नवीन दामिनी जन्माला येण्यापेक्षा एक दुर्गा किंवा कालीमाता जन्माला यावी आता फक्त . एक झाशीची राणी किंवा एक जिजाऊ जन्माला यावी . मुलीनी आता स्वतःचे रक्षण स्वतःच करायला शिकले पाहिजे . आपण जर एका पुरुषाला जन्म देवू शकतो तर त्याला प्रसंगी अद्दलहि घडवू शकतो . पुरुषाला जन्म स्त्रीनेच दिलाय हे आता पक्क ध्यानात घेतले पाहिजे प्रत्येक स्त्रीनेच . प्रत्येक मुलीने स्वतःच स्वतःचे रक्षण करायला शिकावे आता . आपल्याही मनगटात जोर आहे हे दाखवून द्यावे . घराबाहेर पडताना कायम हातात एखादी मिरचीची पावडर सोबत असू द्या . जर वेळ आलीच तर तिचा जरूर वापर करा . एक राखी आपणच आपल्या हातात बांधा आणि स्वतःलाच वचन द्या कि माझे रक्षण मी स्वतःच करायला शिकेल आता . आपल्यातील आत्मविश्वास जागा करा . आपणही कुणापेक्षा कमी नाही हे जगाला दाखवून द्या . सर्वच पुरुष वाईट असतात असे नाही ,पण काही वाईट पुरुषामुळे आज असे बोलावे लागते आहे . जे पुरुष चांगले आहेत त्यांना माझा मनापासून नमस्कार .......
भावानेच बहिणीचे रक्षण करावे ,असे काही नाही ......
बहिणि पण आता सक्षम आहेत .......
स्वतःचे रक्षण स्वतःच करायला ........
त्या हि कशातच कमी नाहीत ........

मंदाकिनी रासकर ..... ____/____

- ***<u>मी तीच स्त्री आहे,</u>***

जिने नऊ महिने तुला गर्भात वाढवले,
ह्या सुंदर रंगीबेरंगी दुनियेत नवीन जीवन दिले,
ओठांवर पहिल्या शब्दांचे अंकुर रोविले,
ऊन , थंडी , पावसातही तुला मायेच्या ओलाव्यात जपून ठेवले.

मी तीच स्त्री आहे,
जिने तुला मोठ्या भावाचे स्थान दिले,
राखीची रेशीम गाठ बांधून आपले नाते मजबूत केले,
आणि तू मला माझ्या रक्षणाचे वाचन दिले,

मी तीच स्त्री आहे,
जिने तुला बघताच तुझ्यात परमेश्वराचे रूप पहिले,
तुझ्याबरोबर सप्तपदी चालून तुझ्या चरणी माझे जीवन वाहिले,
तुला पतीचा दर्जा देऊन परमेश्वराकडून जन्मोजन्मी तुलाच मागितले.

मी तीच स्त्री आहे,,
जी तुला बाबा -बाबा म्हणून कधीच नाही थकले,
तुझे बोट धरून चालताना स्वतःला सुरक्षीत समजले,
तू माझा बाबा आहेस हे सगळ्यांना अभिमानाने सांगितले.

मी तीच स्त्री आहे,
जिने झाशीची राणी बनून तर कधी सावित्रीबाई फुले बनून,
स्त्रीला जगण्याचे धौर्य दाखविले,
स्वतःकडे स्त्री म्हणून गर्वाने पहिले.


पण आज ...।

मी तीच स्त्री आहे,
जी या दुनियेत काय तर घराबाहेर पडायला घाबरते,
इंग्रजांशी लढताना नाही , तर आता अंधाराला पाहून मागे सरकते,
चार-
चौंघांसमोर माझ्यावर होणाऱ्या  अत्याचारालाही कोणत्या भावाची धाव नसते,

मी तीच स्त्री आहे,
जी स्वतःचा जीव मुठीत घेऊन जगते,
आज लोकल ट्रेनमध्ये चढतानाही माझे ह्रुदय फाटते,
अजूनही मी एक अबला नारी म्हणूनच फिरते,

मी तीच स्त्री आहे,
जिला स्वतःला  ऊन  थंडी पावसातून वाचविण्याचे सामर्थ आहे ,
पण स्वतःची  अब्रू वाचविण्यासाठी ती असमर्थ आहे

मी तीच स्त्री आहे,



## ***खरंच नवरा असा असतो का ?***

खरंच नवरा असा असतो का ?
बाहेर वाघ आणि घरी घाबरून राहतो का ?
ऑफिसची तारेवरची कसरत करून घरची ड्युटी करण्यासाठी सज्ज असतो का?
खरंच नवरा असा असतो का ?

कितीही टेंशन असलं तरी , बायको आणि आई यातील गुंता सोडवत असतो का ?
स्वतःची इच्छा बाजूला ठेऊन दोघींना खुश ठेवत असतो का?
खरंच नवरा असा असतो का ?

हवे -हवेसे वाटणारे मित्र बायकोसाठी दूर लोटतो का ?
मित्रांबरोबर पार्टीला जायचं असतानाही बायकोकडे पाहून नाही म्हणतो का ?
खरंच नवरा असा असतो का ?

स्वतः आजारी असताना पेनकिलर खाऊन झोपी जातो का ?
आणि बायकोला काही झालं तर सुट्टी टाकून तिची सेवा करतो का ?
खरंच नवरा असा असतो का ?


लग्नाआधी बायको अप्सरा वाटते का?
आणि लग्नाचा २५ वा वाढदिवस साजरा करतानाही त्याला बायकोत तीच अप्सरा दिसते का ?
खरंच नवरा असा असतो का ?

तिने कितीही रुसवे -फुगवे केले तरी त्याला तीच हवी असते का ?
तिची चूक असली तरी तिच्या मांडीवर डोके ठेऊन तो sorry बोलतो का?
खरंच नवरा असा असतो का ?

वाटपोर्णीमेला बायकोबरोबर तिला न कळता तो उपाशी राहतो का ?
तोही तिच्याबरोबर जन्मोजन्मी हीच बायको मिळो म्हणून साकडे घालतो का ?
खरंच  नवरा असा  असतो का ?

लग्नानंतर तो तिला आई - वडिलांच प्रेमही देतो का ?
माहेरची उणीव सासरी भरून काढण्याचा सतत प्रयत्न करत असतो का ?
खरंच  नवरा असा  असतो का ?

नवरा आणि बायकोचं नातं स्वर्गातच ठरलेलं असतं का ?
म्हणूनच नवरा असा  असतो का?
स्नेहल  अभिजित  जाधव



## ***ती...***

मखमली वाटेवर चालण्याची स्वप्नं
उराशी बाळगून, निघाली ....

स्वप्नाळू डोळे आणि निष्पाप
प्रसन्नता चेहेऱ्यावर,
कोमल स्वच्छंद पावलांमध्ये
किणकिणणारे पैंजण,
अवखळ भुरभुरणाऱ्या बटा आवरत,
मऊशार हिरवळ न्याहाळत - निघाली .....

आईच्या कुशीतली माया, आणि
बाबांच्या नजरेतला आधार,
घट्ट धरून ठेवून आज वरले संस्कार, ... निघाली.
समोर दिसणाऱ्या चढणी, वळणं,
दगड, खड्डे नजरेत साठवत, निघाली .....

सुकुमार पावलाला पहिली ठेच!
दुखावलेला जीव सावरत,
डोळ्यातील अश्रू आवरत,
ठेचेचा अनुभव साठवत,
मागे वळून न पाहता, आत्मविश्वासानं निघाली ....

पाहिलं वळण! मागचं दृश्य दृष्टीआड!
पलीकडलं दृश्य अनिमिष नेत्रांनी
अवलोकत,
नवीन विश्वाची निर्मिती साधत निघाली .....

नव्यानंच दिसणाऱ्या देखाव्यानं
हरखली, रमली, रेंगाळली, लोभावली.
अनेक वेदना, सल, जखमा झेलत अन सोसत
स्वाभिमानानं, सगळं बळ एकवटून, निघाली .....

चढणीवर नेटानं, जिद्दीनं चढली,
चेहेऱ्यावर अनुभवाच्या रेषा, अन
पावलांच्या भेगांची दखल न घेता-
उरभरून श्वास घेवून, निघाली ....

डोळ्यात इतरांना देण्यासाठी स्वप्नं, अन
पाहिलेली स्वप्नं पुरी करण्याची जिद्द,
वाटेतल्या सगळ्यांना देत, निघाली ....

आता, समोर उतारच उतार ......

नेहा आठवले

nehaathavale64@gmail.com

~~~~~~
~~~~~~

# आरोग्य

## डोळ्यांची काळजी

आपण आपले शरीर, चेहरा सुंदर दिसावा म्हणून बरीच काळजी घेतो. मात्र, तितकीच काळजी आपण डोळ्यांची घेतो का? डोळे सुंदर दिसावेत म्हणून आपण प्रयत्न करतही असू, मात्र त्याचबरोबर आपल्याला डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता काही महत्वाचे उपाय खालीलप्रमाणे, १) डोळ्यांची निरोगी वाढ व्हावी आणि ते शेवटपर्यंत चांगले, कार्यक्षम राहावे यासाठी 'अ' जीवनसत्व असलेल्या हिरव्यापालेभाज्या, दूध, अंडी , मांस, मासे यांचा आहारात समावेश करावा. २) काजळ, सुरमामध्ये समाविष्ट केलेल्या रासायनिकपदार्थांमुळे डोळ्यांना इजा होवू शकते. त्यामुळे त्याचा वापरशक्यतो टाळावा.

३) भुवया व पापण्यांना आकार देण्यासाठी पेन्सिलीचा वापर केला जातो. अशा सौदर्यप्रसाधनांच्या वापरामुळेडोळ्यांच्या नाजूक त्वचेवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

४) मधुमेह, रक्तदाब आणि टी. बी. असलेल्या रुग्णांनीआपल्या डोळ्यांची दरमहा तपासणी करावी.

५) उन्हात जाताना, वाहन चालविताना अथवा कंपनीतीलकामगारांनी चष्मा अवश्य वापरावा.....

## दुर्गंधीयुक्त घामापासून सुटका होण्यासाठी..

अधिक मेहनत केल्याने अथवा भर उन्हात फिरल्याने अंगाला घाम येणारच. मात्र तरीही काही व्यक्तींना घाम येण्याचे प्रमाण इतरांपेक्षा जास्त असते आणि त्यामुळे घामाची दुर्गंधी देखील पसरते. वयात येईपर्यंत मुलांच्या घामाला कुठलाही वास नसतो.वयात आल्यानंतर विशिष्ट स्वरूपाचा वास सुरू होतो. काहींमध्ये ही दुर्गंधी इतक्या मोठय़ा प्रमाणावर येते की चारचौघात मान खाली घालावी लागते.यासाठी काहीघरगुती उपचार पुढीलप्रमाणे.....

१) भरपूर पाणी प्यावे, पोट साफ ठेवावे.

२) नियमितपणेदिवसातून दोन वेळा आंघोळ करावी.आंघोळीच्या पाण्यात सुगंधी द्रव्यांचा जसे गुलाब पाण्याचे चार ते पाच थेंब, डेटॉल, युडीकोलोनचा वापर करावा.आंघोळीनंतर डिओड्रंट, पावडरचा वापर केल्यास अधिकफायदेशीर ठरते.

३) शक्यतो अधिक घाम येईल, अशा कपड्यांचा वापर करूनये. परिधान केलेले कपडे, हातरुमालावर सुगंधी द्रव्यांचावापर करावा.

४) घाम त्वचेवर साचून राहिल्यास विविध आजार होण्याचीशक्यता असते. यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# भक्ती गीत ...



गणेश वंदना

नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका ।
वरद विनायक तुमची महती । ईच्छापूर्ती तव कृपेनी ।
मंगलमुर्ती गणाधीपती । महड निवासी जग उद्धारी ।
विद्या बुद्धी भक्तां वरसी  शरण तुम्हांसी महागणपती ।

नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका

तुम्ही कृपेची सदा सावली । स्मरण करता कार्य सिध्दी ।
दर्शन घेता दुःख हरती । पाप सरती मोक्ष प्राप्ती ।
नामस्मरणे आत्मशक्ती  । भक्ति रसाची नवी अनुभूती ।

नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका ।

यत्रा करता मन आनंदी । विघ्ने टळती भय पळती ।
सगुण स्वरुप प्रसन्न मुर्ती । ह्रदयी सदैव कोरुन नेती ।
भव सागरी या तरुन नेसी  आत्मसुखाची येई भरती

नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका ।
कला संस्कृती तुमच्या दासी । सर्व सिद्धी आम्हां लभती ।
तुम्हां समर्पीत कलाकृती । कला सेवेची आनुमती द्यावी. ।

नमीतो तव चरणासी । गजानना वरदायका ।

---------------------------------------

॥ श्री वरद विनायक प्रसन्न ॥

। तुमच्याच ठायी, तुमच्याच ठायी
।
। मज राम प्रभु मज राम प्रभु ।
। मज गोविंद हरि गोविंद ।
। बालाजी हरि गोविंद ।
। मज पांडूरंग हरि विठ्ठल ।
॥ हे वरद विनायका, विनायका ॥

। तुमच्याच ठायी, तुमच्याच ठायी
।
। मज लक्ष्मी आइ भवानी ।
। मज शारदा माता रेणूका आइ
यमाइ ।
। मज सप्तश्रृंगी आइ चतु:श्रृंगी ।
। मज शक्तीपीठे साडेतीन सारी ।
॥ हे वरद विनायका, विनायका ॥

। तुमच्याच ठायी, तुमच्याच ठायी
।
। मज शिव शंकर, भोलेनाथ ।
। मज केदार मज रामेश्र्वर ।
। मज विश्वेश्वर मज सोमनाथ ।
। मज आत्मलिंग अमरनाथ ।
। मज ज्योतिर्लिंग द्वादश सारी ।
॥ हे वरद विनायका, विनायका ॥

। तुमच्याच ठायी, तुमच्याच ठायी
।
। मज श्री गुरु, दत्त गुरु ।
। स्वामी समर्थ, गुरु गजानन ।
। मज समर्थ नवनाथ मज ।
। मज तीर्थ स्थाने, समाधी घाट
सारे ।
॥ हे वरद विनायका, विनायका ॥

। तुमच्याच ठायी, तुमच्याच ठायी
।
। मज परब्रह्म साक्षात मज ।
। मज सरस्वती रुप सुंदर ।
। मज मुक्तीधाम वैकूंठ अवघे ।
। मज निज धाम, परम धाम मज
।
॥ हे वरद विनायका, विनायका ॥

---------------------------------------------
---

बोला हरी विठ्ठल
विठ्ठल नामा संगे वाजतो मृदुंग
टाळ हाती घेऊनी रंगे भक्ती नाच
माणसा परी अभंग आज भाग्यवंत

भगवत सेवा सदा सदा संत संग
विठ्ठल नामा संगे वाजतो मृदुंग
चार घटका विसारु दु:ख विसरु प्रपंच
नामस्मरण करता करता साधुया परमार्थ

विठ्ठल नामा संगे वाजतो मृदुंग
अंत्तरंगी जडला हाच नाम छंद
मंन:शांती मिळे मिळे आत्मानंद

विठ्ठल नामा संगे वाजतो मृदुंग
भक्ती रसे रंगु चला धरु वारी वाट
सार्थ झाहला जन्म सफ़ल जगण

चित्त बोले विठ्ठल विठ्ठल
वाणी बोले विठ्ठल विठ्ठल

काया बोले विठ्ठल वीठ्ठल
आत्मा बोले विठ्ठल वीठ्ठल

म्हणा हरी विठ्ठल वीठ्ठल
बोला हरी विठ्ठल वीठ्ठल
विठ्ठल वीठ्ठल वीठ्ठल
विठ्ठल वीठ्ठल वीठ्ठल

श्रीगुरु कल्पतरु । सकल संकल्पाधारु
ज्ञान तेज भास्करु । सकल तिमीर संहारु
कला विद्या सिंधू । सकल तृष्णा निवारु
कला यात्री पामरु । मार्ग दावा वडीलधारु
लीन चरणी सदगरु । माया धरावी परमेशु

॥ श्री गणेशाय नम:॥

भव सागरी या मुक्तीचा किनारा तुम्ही
अंधाऱ्या मार्गी या दृष्टीचा प्रकाश तुम्ही
खडतर आयुष्या आशेचा किरण तुम्ही
अज्ञानी साधका या ज्ञानाचा दीप तुम्ही

जय गुरुदेव जय जय गुरुदेव
श्री गुरुदेव जय जय गुरुदेव

मातीचा गोळा आम्ही घडविता ब्रह्मा तुम्ही
अडखळते बालक आम्ही चालविता विष्णु तुम्ही
भरकटते भोगी आम्ही करारी शीव तुम्ही
पामरसे भक्त आम्ही सक्षात परब्रह्म तुम्ही

जय गुरुदेव जय जय गुरुदेव
श्री गुरुदेव जय जय गुरुदेव

शरणागत लीन चरणी अभयदान पडो पदरी
जन्मोजन्मीचा पापी गंगास्नान घडो आजी
अतृप्त पीडीत चक्री कृपामृते मिळो तृप्ती

चटके अज्ञान धगी ज्ञानचंद्रे लाभो शांती

जय गुरुदेव जय जय गुरुदेव
श्री गुरुदेव जय जय गुरुदेव

आळवितो तव सदगुरु राया
प्रगतीचा मज प्रसाद द्यावा
परिस स्पर्शे योग जुळवा
सुवर्ण-मय जन्म घडवा

जय गुरुदेव जय जय गुरुदेव
श्री गुरुदेव जय जय गुरुदेव

दत्त दत्त श्री गुरुदेव दत्त श्री गुरुदेव दत्त श्री गुरुदेव दत्त
दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा
॥ आवधुत चिंतन श्री गुरुदेव दत्त. ॥

-------------------------

राम नाम
राम राम बोले हे मन
राम राम चित्ती हा जप
राम नाम हे शिव स्तवन
राम नाम शमवे विषदाह

राम नाम एक आधार
राम नाम जन्मोद्धार
राम नाम हे मोक्षद्वार
राम नाम शांती धाम

राम नाम घेता सुटे
मोह-पाश अन घोर-पाप
राम नाम अमृत पान
राम नाम मुक्तीद्वार

राम नाम घ्यावे नित्य
राम जप अंतरी निरंतर
हाच धर्म हेच कर्म
कलियुगे एक हा यज्ञ
फल प्रसाद सदा-सर्वहित
------------------------
मंगेश मधुकर मेढी.
सदस्य म.स.प. तळेगांव
दाभाडे,मावळ.
९८८१४९०१४७

# सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

## माझ्यामना ई प्रकाशन

